# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२३**

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

## शिळफाटा-कोन रस्ता (जि.ठाणे) या रस्त्यामध्ये बाधीत होणाऱ्या नागरिकांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(१) ३२६१६ (११-०१-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिळफाटा-कोन रस्ता (जि.ठाणे) या रस्त्यामध्ये बाधीत होणाऱ्या नागरिकांना नुकसान भरपाई मिळाली नसल्याची बाब दिनांक २० ऑक्टोबर २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्याचे काम सुरु असतानाही नुकसान भरपाई न देण्याची कारणे काय आहेत,

(३) सदर, बाधीतांना कधीपर्यंत नुकसान भरपाई मिळणार आहे व त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

कल्याण-शीळ रस्ता बाधितांना मोबदला मिळण्याबाबतचे दि.२३ ऑक्टोबर, २०१८ चे पत्र महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास दिनांक २४ ऑक्टोबर, २०१८ रोजी प्राप्त झाले.

(२) व (३) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी कल्याण शिळफाटा या २१ कि.मी. रस्त्याचे बांधकाम व रुंदीकरण सन १९९०-९१ पुर्वी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत व सन १९९१-२००० साली बांधकाम व रुंदीकरण कल्याण डोंबिवली व ठाणे महानगरपालिकेमार्फत करण्यात आली असल्याबाबतची तपासणी करुन, याबाबतचे भूसंपादन व भुसंपादनाचा मोबदला बाधीत भुधारकांना व शेतकऱ्यांना देण्यात आला किंवा कसे, याबाबत तपासणी करुन शासनास अहवाल सादर करण्यासाठी शासन निर्णय क्रमांक बैठक-२०१८/प्र.क्र.१५९/रस्ते-८, दिनांक १३.०५.२०२२ अन्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने त्यांचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालय यांचे पत्र क्र.उजि/समन्वय/टे-१/भिवंडी-कल्याण शिळफाटा/ अहवाल/कावि/१८५६/२०२२ दि.११.११.२०२२ अन्वये शासनास सादर केलेला आहे. सदर अहवालाच्या निष्कर्षानुसार भिवंडी कल्याण शिळफाटा रस्त्यासाठी भिवंडी तालुक्यात रस्त्यासाठी आवश्यक असणारी जमीन यापुर्वीच भूसंपादीत झाली आहे. तसेच, कल्याण तालुक्यात ६.५९७१ हे. व ठाणे तालुक्यात १.१६३१ हे. या खाजगी क्षेत्राचे भूसंपादन झाल्याचे दिसून येत नाही.

याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२.०५.२०२३ रोजी झालेल्या बैठकीत निर्देश दिले की, चौकशी अहवालातील सदर निष्कर्षानुसार कल्याण व ठाणे तालुक्यातील अंदाजित ७ ते ८ हेक्टर खाजगी जमिनीचे भूसंपादन झाले नसल्याचे दिसून येते. सदर खाजगी जमिनीसाठीचा भूसंपादन प्रस्ताव महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे सादर करावा. त्या जमिनीचे जिल्हाधिकारी, ठाणे यांनी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार / नियमानुसार भूसंपादनाची कार्यवाही पुर्ण करुन भूसंपादनासाठी आवश्यक असलेल्या निधीची मागणी महामंडळाकडे करण्यात यावी. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने सदर निधी शासनाकडून प्राप्त करुन घेऊन जिल्हाधिकारी, ठाणे यांनी वर्ग करण्याची कार्यवाही करावी.

मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या उपरोक्त निदेशानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ आणि जिल्हाधिकारी, ठाणे यांना कार्यवाही करण्यासाठी दिनांक १६.०५.२०२३ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शासकीय / निमशासकीय व महामंडळातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करू न केलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत घेण्याबाबत

**(२) ३४१९२ (१२-०१-२२). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय/निमशासकीय व महामंडळातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करू न शकल्याने बडतर्फ झालेल्या सर्व कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर ११ महिन्याकरिता पुन्हा शासकीय सेवेत घेण्याचे आदेश शासन निर्णय क्रमांक बीबीसी २०१८/प्र.क्र ३०८/ १६ ब /सामान्य प्रशासन दिनांक २१ डिसेंबर २०१९ नुसार शासनाने निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी सदर शासन निर्णय निर्गमित होऊन सुद्धा सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना अद्याप निवृत्ती वेतनाचा लाभ देण्यात आला नाही तसेच बडतर्फ कर्मचाऱ्यांना सेवेत सामावून घेतले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास ज्या कर्मचाऱ्यांना सेवा संरक्षण देऊन खुल्या प्रवर्गात सामावून घेतले आहे अशा कर्मचाऱ्यांचा अधिसंख्य पदावर समावेश होत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी किती अधिसंख्य पदे निर्माण केली व किती कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०७-२०२३) :** (१) व (२) अंशत: खरे आहे. अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे सेवामुक्त केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना ११ महिन्याच्या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्याचे आदेश दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

अधिसंख्य पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ देण्याचे आदेश दि.१४.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

(३) हे खरे नाही. अनुसूचित जमातीच्या जात प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत रुजू झालेल्या व त्यानंतर अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यामुळे सेवा संरक्षण देऊन विशेष मागास प्रवर्गात समावेश केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांनाही अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे आदेश दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

(४) सर्व प्रशासकीय विभागाकडून प्राप्त माहितीनुसार एकूण ६८६० अधिसंख्य पदे निर्माण करण्यात आलेली आहेत व त्यानंतर १३४३ अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना नियुक्त्या देण्यात आल्या आहेत.

(५) अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे पदोन्नती व अनुकंपा धोरण वगळून इतर सर्व सेवाविषयक व सेवानिवृत्ती विषयक लाभ दि.१४.१२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

---

## मुंबई महानगरपालिकेत पदे रिक्त असल्याबाबत

**(३) ४६८३४ (३०-१०-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेत पाच सहाय्यक आयुक्त, चार उपायुक्त आणि एका सहआयुक्तांची पदे रिक्त असल्याची बाब माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदांसह काही अधिकारी अतिरिक्त पदांचाही कार्यभार अनेक महिन्यांपासून सांभाळत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पालिकेतील अधिकाऱ्यांवर येणारा ताण पाहता अधिकाऱ्यांची पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२३) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेत सहाय्यक आयुक्त संवर्गाची १७ पदे व उपायुक्त संवर्गाचे १ पद रिक्त आहे. तसेच, उपायुक्त/उपायुक्त (सुधार) संवर्गातील ६ सेवाज्येष्ठ उपायुक्तांना "सह आयुक्त" निवडश्रेणी लागू करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्त संवर्गातील १६ रिक्त पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आले आहे.
उपायुक्त संवर्गातील रिक्त असलेले १ पद पदोन्नतीने भरण्याबाबतची कार्यवाही कार्यान्वित आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील चांदिवली येथे २५० खाटांचे अद्ययावत रुग्णालय कार्यान्वीत करण्याबाबत

**(४) ४७७७२ (३०-१०-२०२२). श्री.दिलीप लांडे (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील चांदिवली येथे २५० खाटांचे अद्ययावत रुग्णालयाकरिता महानगरपालिकेच्या आरक्षित भूखंडावर (नगर भूमापन क्र. ११९/४) अद्ययावत रुग्णालय मंजूर करण्यात आले असून केवळ निविदा न काढल्यामुळे रुग्णालयाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रुग्णालयाकरिता निविदा काढण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर २५० खाटांचे रुग्णालय कार्यान्वीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२३) :** (१), (२) व (३) सदर कामासाठीची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून, कंत्राटदाराला दिनांक २१.०४.२०२३ रोजी स्वीकृतीपत्र देण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुसावळ शहरातील अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजना पूर्ण करण्याकरिता

**(५) ४९०६२ (२५-०९-२०२२). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्रीमती सीमा महेश हिरे (सीमाताई) (नाशिक पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.रवि राणा (बडनेरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भुसावळ शहरातील अटल मिशन फोर रेज्युवेनशन अँड अर्बन ट्रान्सफॉर्मेशन (अमृत) योजनेस मूळ प्रशासकीय मंजुरी सन २०१७ मध्ये मिळाली असून त्यात ९० कोटी ८४ लाख रुपये खर्चातून पहिल्या टप्प्यातील २१४ किलोमीटर अंतराची पाईपलाईन, ४५ एम.एल.डी.चे जलशुद्धीकरण केंद्र, ११ जलकुंभ उभारणी नियोजित होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नियोजित योजनेत वाढीव १४४ किलोमीटरची पाईप लाईन, पाण्याचा उद्भव बदलल्याने ८०० मिमीची १० किमीची पाईपलाईन, इत्यादी नवीन कामांमुळे योजनेची किंमत रुपये ९५ कोटी रुपयांनी वाढली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मूळ प्रशासकीय मंजुरीला पाच वर्षे उलटूनही सदरील योजना वेळेत पूर्ण झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरील प्रकरणी वाढीव कामांना तांत्रिक व प्रशासकीय मंजुरीसाठी दिरंगाई झाल्याने सलग तीन वेळा मुदतवाढ देऊनही सदरील पाणी पुरवठा योजना वेळेत पूर्ण झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, भुसावळ शहरातील अमृत योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर पूर्ण करण्याकरिता शासनाकडून कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत भुसावळ शहराच्या रुपये ९०.८५ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली होती.

दरम्यानच्या कालावधीत भुसावळ नगरपरिषदेने पाणीपुरवठा प्रकल्पाचा तांत्रिक बदलाचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत गठीत राज्यस्तरीय तांत्रिक समितीसमोर सादर केला होता. सदर बैठकीतील निर्णयानुसार या प्रकल्पाची किंमत कमी करून रुपये ४८.२४ कोटी किंमतीच्या सुधारित किंमतीस मान्यता देण्यात आलेली असून यामध्ये वितरण व्यवस्था व १० उंच जलकुंभाची कामे पूर्ण करण्याची कामे समाविष्ट आहेत.

योजनेतील उर्वरित कामे केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत नगरपरिषदेमार्फत प्रस्तावित करण्यात आलेली असून सदर कामांचा प्रस्ताव केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान किंवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत विचारात घेण्यात येईल.

---

## पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढल्याबाबत

**(६) ४९५५८ (१८-०१-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांत बोगस भरतीच्या नावाखाली तब्बल ६४२ कर्मचाऱ्यांना कामावरून काढले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी २३ गावांतील कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्यायाबाबत त्या कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी कामावरून कमी केलेल्या ६४२ कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय व चौकशी अंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांनी दि.२०/१२/२०२१ रोजी चौकशी अहवाल आयुक्त, पुणे मनपा यांच्याकडे सादर केला आहे. सदर अहवालामध्ये ६७२ कर्मचारी नियमाबाह्य असल्याचे नमूद आहे. त्यानुसार ६७२ कर्मचारी यांना दि. ०३/०२/२०२२ पासून कामावरुन कमी करण्यात आले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) कामावरून कमी केलेल्या कर्मचाऱ्यांवरती उपासमारीची वेळ आली असून बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली असल्याचे लोकप्रतिनिधींनी निवेदनात नमुद केले आहे.
(४) विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे यांच्याकडून दि.२२/०९/२०२२ रोजीच्या पत्रान्वये चौकशी अहवाल महापालिका आयुक्त, पुणे मनपा यांच्याकडे सादर केला आहे. सदर अहवालात “भरती प्रक्रिया असल्या कारणाने सदर भरती प्रक्रियेद्वारे नेमणूक देण्यात आलेले ग्रामपंचायत कर्मचारी अपात्र ठरतात” असे नमूद केले असून महापालिका आयुक्त, पुणे यांनी सदर अहवाल स्वीकृत केला आहे.
(५) नाही.

---

## मौजे सैय्यद पिंपरी (ता.जि.नाशिक) येथील जागा कृषी पणन महामंडळाला हस्तांतरित करुन प्रकल्पाचे काम सुरु करण्याबाबत

**(७) ४९७६६ (२४-०१-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सैय्यद पिंपरी (ता.जि.नाशिक) येथील गट न.१६५४ क्षेत्र ४३ हे ३७ आर पैकी १०० एकर जागा नाशिक कृषी टर्मिनल या प्रकल्पाला उपलब्ध करून देण्याचा दिनांक ९ जून, २०२२ व दिनांक ११ जून, २०२२ रोजी शासनाने निर्णय घेवूनही माहे नोव्हेंबर २०२२ मध्ये वा त्यादरम्यान सदर जागा राज्य कृषी पणन मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी महाराष्ट्र राज्य कृषी पणन महामंडळाला जमीन त्वरीत हस्तांतरित करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास नाशिक जिल्हा प्रशासनाला निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने कृषी पणन महामंडळाला जमिन हस्तांतरित करून या प्रकल्पाचे काम सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) मा.मंत्रीमंडळाच्या दि.०८.०३.२०१८ रोजीच्या बैठकीत नाशिक कृषि टर्मिनल मार्केटकरीता मौजे पिंप्री सैय्यद येथील सर्वे क्र.१६५४ व १६२१ मधील १०० एकर जागा विनामुल्य पणन मंडळास हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर प्रधान सचिव (पणन) यांनी दि.१९.०७.२०१९ रोजी जागेची प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानुसार गट क्र.१६२१ मधील ५४.५५ हे.आर. पैकी २४.५५ हे.आर. इतकी जमीन व गट क्र.१६५४ मधील ४३.३७ हे.आर.पैकी १५.४५ हे.आर. इतकी जमीन टर्मिनल मार्केटसाठी देण्यात यावी, असा सुधारीत प्रस्ताव जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय येथे दि.०९.०६.२०२२ रोजी झालेल्या बैठकीत गट क्र.१६२१ मधील जागेवर शैक्षणिक आरक्षण असुन, क्षेत्रबदल करण्यासाठी ३० टक्के अधिमूल्य दरानुसार अंदाजित रु.२१.०० ते २४.०० कोटी, प्रक्रिया शुल्काची ०.०५ टक्के प्रमाणे रु.३७.१३ लक्ष व हस्तांतरणासाठी जागेच्या मुल्याच्या १० टक्के प्रमाणे अंदाजित रु.७.८ कोटी इतकी रक्कम नगर रचना विभाग, नाशिक यांचेकडे भरणा करावी लागणार असल्यामुळे, त्याऐवजी गट क्र.१६५४ मधील जागा योग्य राहिल असे सूचविण्यात आले होते. मात्र, गट क्र.१६५४ मध्ये अनेक ठिकाणी चढउतार व खाणी खोदलेल्या असल्याबाबत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या प्रतिनिधींनी दि.०९.०६.२०२२ च्या बैठकीत नमूद केलेले आहे. त्यामुळे टर्मिनल मार्केटसाठी गट क्र.१६२१ मधील जागा उपलब्ध करुन देण्यासाठी क्षेत्रबदल प्रक्रिया नि:शुल्क करण्यासाठी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाने नगर रचना विभाग, नाशिक यांना विनंती केलेली आहे. याबाबतची कार्यवाही सुरु असल्यामुळे प्रत्यक्षात जागा हस्तांतरीत झालेली नाही.

(२) मौजे सैय्यद पिंपरी (ता.जि.नाशिक) येथील जमीन टर्मिनल मार्केटसाठी हस्तांतरीत करण्याबाबत श्री.छगन भुजबळ यांनी दि.२३.०९.२०२२ च्या पत्रान्वये नाशिक जिल्हा प्रशासनाला निवेदन दिलेले आहे.

(३) सदर जागेवर अनेक ठिकाणी चढउतार व खाणी खोदलेल्या असल्याबाबत महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या प्रतिनिधींनी दि.०९.०६.२०२२ च्या बैठकीत नमूद केलेले आहे. त्यामुळे टर्मिनल मार्केटसाठी गट क्र.१६२१ मधील क्षेत्रबदल प्रक्रिया नि:शुल्क करण्यासाठी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाने नगर रचना विभाग, नाशिक यांना विनंती केलेली आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगांव (जि.नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात व्यापाऱ्यांकडून शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किमतीवर मका खरेदी केल्याबाबत

**(८) ५०२०५ (०९-०५-२०२३). श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि नाशिक) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मका लिलाव सकाळच्या सत्रात १७५० प्रति क्विंटल दराने खरेदी केलेला मका दुपारच्या लिलाव सत्रात व्यापाऱ्यानी केवळ १२०० ते १३०० प्रति क्विंटल खरेदी केल्यामुळे संतप्त झालेल्या मका उत्पादक शेतकऱ्यांनी लिलाव बंद पाडून कॅम्प रोडवर रास्ता रोको आंदोलन केल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बाजार समितीच्या आवारातील व्यापाऱ्याकडून शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमतीनुसार मका खरेदी केला जात असल्याबाबत शेतकऱ्यांनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

मालेगांव कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये दिनांक १८/१०/२०२२ रोजी सकाळच्या सत्रात मक्याचा लिलाव सुरु झाल्यानंतर सुरुवातीस रु. १५५६, रु. १९०० व रु.२२३१ या बाजार भावाने लिलावास सुरुवात झाली. त्यानंतर काही शेतक-यांनी विक्रीसाठी आणलेला मका ओला व कमी मॉईश्चरचा असल्याने सदर मक्याचे बाजारभाव रुपये १४००/- पासून पुढे सरासरी बाजारभाव निघाले. त्यापैकी सकाळ सत्रात एका शेतकऱ्याचा जास्त मॉईश्चर असलेला माल रु. १२००/- पर्यंत विक्री झाल्यानंतर त्या संतप्त शेतक-याने इतर शेतकरी बांधवाना जमा करुन मालेगांव कॅम्परोडवर रस्ता रोको आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. परंतु सदर शेतक-याचा माल जास्त ओला असल्यामुळे आंदोलन करणारे शेतकऱ्यांशी बाजार समितीने चर्चा करुन व संबंधीत शेतक-यास सदरची परिस्थिती निदर्शनास आणून दिली. त्यानंतर संबंधीत शेतक-याची समजूत काढल्यानंतर लगेच मक्याचा लिलाव पुन्हा पूर्ववत सुरु झाला.

(२) हे खरे नाही.

शासनाने ह्या वर्षी सन २०२२-२३ हंगामामध्ये जाहीर केलेल्या (FAQ) दराप्रमाणे मक्याची आधारभूत किंमत रु. १९६२/- निश्चित केलेली आहे. व त्यानुसारच आधारभूत किंमतीपेक्षा जास्त दराने बाजार समितीमध्ये मक्याची विक्री होत आहे. दिनांक १८/१०/२०२२रोजी बाजार समितीमध्ये ओला मका विक्रीसाठी येत असल्याने मका मॉईश्चर (२५ पेक्षा जास्त असल्याने मक्याचे बाजारभाव हे कमीत कमी रूपये १२००/, जास्तीत जास्त रु २३९०/, सरासरी बाजारभाव रुपये २०३० पर्यंत होते. मक्याची आधारभूत किंमत रु.१९६२/- ही स्वच्छ व काळे खराब दाणे नसलेले व १४ माईश्चर पेक्षा कमी असलेले मक्यासाठी ठरलेली आहे. सदर बाब पहाता ओला व कमी प्रतीचा मका वगळता बाजार समिती आवारात व्यापा-याकडून शासनाने निश्चित | केलेल्या आधारभूत किंमतीपेक्षा कमी बाजार भावात मका खरेदी झालेला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

आंदोलन करणारे शेतकरी बांधवांनी तक्रार अर्ज केला नसल्याने सदर प्रकरणी चौकशीचा प्रश्न उद्भवत नाही.

---

## कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील मौजे बेलवली येथील गुरचरण जागेवरील अतिक्रमण हटविण्याबाबत

**(९) ५०८९६ (२०-०१-२०२३). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुळगाव-बदलापूर (जि.ठाणे) नगरपरिषद हद्दीतील मौजे बेलवली येथील सर्व्हे नं. ८३/२ या गुरचरण जागेवरील अतिक्रमण हटविण्याबाबत व त्याठिकाणी सार्वजनिक वाचनालयाचे बांधकाम करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी

नगरपरिषद प्रशासनला माहे मे, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान पत्रानुसार मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निदर्शनास आले तदनुसार सदर जागेवरील अनाधिकृत बांधकाम हटवून त्याठिकाणी वाचनालयाचे बांधकाम करण्याबाबत नगरपरिषद प्रशासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) सदरची जागा महसुल विभागाच्या मालकीची असल्याने या जागेवरील अतिक्रमण निष्कासित करण्याची कार्यवाही मुख्याधिकारी, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद व तहसिलदार, अंबरनाथ यांचे समन्वयाने करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविले आहे. सदरचे अतिक्रमण निष्कासित झाल्यानंतर त्या ठिकाणी सार्वजनिक वाचनालय (ग्रंथालय) सुरु करण्याचे नगरपरिषदेचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबाजोगाई (जि.बीड) नगरपरिषदेअंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत पाणी पुरवठा योजनांच्या प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत**

**(१०) ५१०३५ (२०-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) नगरपरिषदेअंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचे जलशुध्दीकरण केंद्र, ०४ पाण्याच्या टाकी (ESR/GSR), वाढीव पाईप लाईन व जुनी पाईप लाईन बदलणे बाबतचा प्रस्ताव नगर परिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्याकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आलेला आहे. हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सध्य:स्थितीत अंबाजोगाई शहराला पाणी पुरवठा करणारे मांजरा प्रकल्प व काळवीट साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरलेले असूनही शहराला महिन्यातून फक्त दोनदाच पाणी दिले जाते. त्यामुळे एन उन्हाळ्यात नागरिकांना पाणी विकत घ्यावे लागत असून सर्वसामान्य नागरिक प्रचंड प्रमाणात त्रस्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे अंबाजोगाई शहराला नियमित पाणी पुरवठा करण्यासाठी जलशुध्दीकरण केंद्र, ०४ पाण्याच्या टाकी (ESR/GSR), वाढीव पाईप लाईन व जुनी पाईपलाईन बदलने बाबतच्या प्रस्तावास तातडीने मंजुरी देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांच्याकडे दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ व १ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत अंबाजोगाई नगरपरिषदमार्फत अंबाजोगाई शहराचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचानालयास सादर करण्यात आला होता. तथापि, सदर प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २०१९-२० मधील दरसूचीवर आधारित होता.

दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसुचीत बदल झाल्यामुळे सदर प्रकल्पाचा प्रस्ताव चालू दरसूचीनुसार केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान किंवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान यापैकी योजनांच्या विहित कार्यपद्धतीनुसार सादर करण्याच्या सूचना मुख्याधिकारी, अंबाजोगाई नगरपरिषद यांना दिनांक १५ डिसेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

(२) मांजरा प्रकल्प धनेगाव व काळवटी साठवण तलाव पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. तथापि, अस्तित्वातील वितरण व्यवस्थेप्रमाणे शहरास सात दिवसाआड पाणीपुरवठा करण्यात येत आहे.
(३) होय हे खरे आहे.
(४) व (५) अंबाजोगाई शहराचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या चालू दरसूचीनुसार केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान किंवा महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान यापैकी संबंधित योजनांच्या विहित कार्यपद्धतीनुसार शासनास प्राप्त झाल्यानंतर विचारात घेण्यात येईल.

---

### कोल्हापूर शहरातील नर्सरी बागेत राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्मारकाबाबत

**(११) ५१०४३ (२०-०१-२०२३). श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर शहरातील नर्सरी बागेत राजश्री छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्मारकाच्या दुसऱ्या टप्प्यातील कामाला तसेच खर्चाच्या अंदाजपत्रकाला प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रशासकीय मान्यता दिली असतानाही गेल्या अनेक महिन्यापासून या कामाला सुरुवात करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून छत्रपती शाहू महाराज समाधी स्मारकाचे काम त्वरित सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) होय,
(२) होय,
(३) सदर काम सुरु करण्यास येणाऱ्या अडचणी दूर करण्याबाबत दिनांक २८ एप्रिल, २०२३ रोजी शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सामाजिक न्याय विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या पदोन्नत्या प्रलंबित असल्याबाबत

**(१२) ५१५८२ (१८-०१-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभाग हा मागासवर्गीय व वंचित समाजाच्या कल्याणासाठी काम करत असून या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची अंतिम सेवा जेष्ठता यादी २०१४ पासून प्रसिद्ध केली नसल्यामुळे सदरहू पदोन्नत्या प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले असून, या प्रलंबित असलेल्या पदोन्नत्या व इतर मागण्यांसाठी माहे जून, २०२२ मध्ये राजपत्रित अधिकाऱ्यांनी खुर्चीवर न बसता सतरंजीवर बसून काम करून प्रतिकात्मक आंदोलन केले असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अतिरिक्त आयुक्त, सह आयुक्त यांच्या पदोन्नतीसाठी गत तीन ते चार वर्षापासून समितीची बैठक न झाल्यामुळे या महत्त्वाच्या १३ पदांपैकी १२ पदे रिक्त तसेच १०८ अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल गेल्या सात वर्षापासून लिहिले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हास्तरीय सहाय्यक आयुक्त यांचे वेतन इतर विभागाच्या तुलनेत कमी आहेत तसेच विभागाच्या नवीन आकृतीबंधास मान्यता मिळाली नसल्यामुळे सामाजिक न्याय विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यावर अन्याय होत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच आदिवासी समाजातील श्री.आर.डी.आत्राम हे सेवानिवृत्तीच्या ३ वर्षापुर्वी सह आयुक्त पदावर पदोन्नतीस पात्र असतांना देखील त्यांना सेवानिवृत्तीच्या अखेरच्या दिवशी म्हणजेच ३० ऑगस्ट, २०२२ रोजी आयुक्त पदावर नाममात्र पदोन्नती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर संपूर्ण प्रकरणी शासनाने सत्वर चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने सामाजिक न्याय विभागातील ज्येष्ठता यादी प्रसिद्ध करुन त्यानुषंगाने समितीची बैठक आयोजित करुन रिक्त असलेली सर्व पदे व इतर मागण्या पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१२-०७-२०२३) :** (१) होय, अंशत: खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे. तथापि सहआयुक्त यांच्या २०२२ मध्ये पदोन्नती समितीची पार पडलेल्या बैठकीमध्ये उपायुक्त संवर्गातून सहआयुक्त सवर्गामध्ये एक अधिकारी व सहाय्यक आयुक्त संवर्गातून उपायुक्त संवर्गांमध्ये तीन अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्यात आलेली आहे.
(३) शासन निर्णय क्र.वेपुर ११२१ प्र.क्र.४/सेवा-९ दि.१३.०२.२०२३ अन्वये सहाय्यक आयुक्त समाज कल्याण व तत्सम गट अ या संवर्गाची वेतनस्तर सुधारीत करण्यास मंजूरी दिलेली आहे. आकृतीबंधाच्या प्रस्तावामध्ये काही प्रमाणात त्रुटी काढण्यात आलेल्या असून, सदर त्रुटींची पूर्तता करुन सुधारीत आकृतीबंध वित्त विभागास सादर करण्यात येत आहे.
(४) व (५) हे खरे नाही.
मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल केलेल्या रि.या.क्र.९४५३/२००४ व रि.या.क्र.९४४९/२००४ च्या अनुषंगाने दि.१४.०६.२०१८ रोजी दिलेल्या निर्णयानुसार दिनांक ०१.०१.१९८० ते अद्याप पर्यंतच्या सेवाजेष्ठता सुधारीत करण्याची कार्यवाही सुरु आहे. दिनांक ०१.०१.२००० ते ०१.०१.२०२१ पर्यंत तात्पुरती सेवाजेष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्याच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत प्रसिध्दीच्या अंकेशंनासाठी बेसिल या संस्थेची नियुक्ती करताना निविदा काढली नसल्याबाबत

**(१३) ५१५९४ (२३-०१-२०२३). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या माहिती व जनसंपर्क विभागामार्फत (ऑडिट व मॉनिटरिंग) प्रसिध्दीच्या अंकेशंनासाठी बेसिल या संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेसिल संस्थेची नियुक्ती करतांना ई- निविदा काढण्यात आलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बेसिल संस्थेला आतापर्यंत किती रुपयांचे व कोण-कोणत्या विभागाचे कार्यादेश दिले आहेत व त्यानुषंगाने किती कालावधीसाठी कार्यादेश दिले आहे याचा तपशिल काय आहे,
(४) असल्यास, बेसिल संस्थेची नियुक्ती करतांना उच्चस्तरीय मान्यता नसतांना बेकायदेशीरपणे नियुक्ती केली असल्याने या संदर्भात शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०६-२०२३) :** (१) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत जाहिरातीचे ऑडिट व विविध मिडीया मॉनिटेरिंगचे कामकाज करण्यासाठी बेसिल या संस्थेची दि.५.४.२०१९ रोजीच्या कार्यादेशान्वये नियुक्ती करण्यात आली होती. मे.बेसिल संस्था ही केंद्र शासनाची माहिती व नभोवाणी मंत्रालया अंतर्गत कार्यरत मिनीरत्न संस्था आहे. सदर संस्था केंद्र शासन व त्या अधिपत्याखालील कार्यालये तसेच अनेक राज्यांच्या विविध मिडीया मॉनिटरिंगचे

(Third Party Monitoring and Evaluation) चे कामकाज करते.
(२) वर नमूद केल्याप्रमाणे बेसिल ही संस्था केंद्र शासनाची मिनीरत्न संस्था असल्याने या संस्थेची नियुक्ती करताना ई-निविदा काढण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) दिनांक २२.२.२०१९ ते दिनांक ३१.०३.२०२१ या कालावधीत बेसिल या संस्थेस विविध विभागांमार्फत कार्यादेश देण्यात आले आहेत. त्याचा तपशिल सोबत जोडलेल्या विवरणपत्रानुसार आहे.
(४) व (५) याबाबत चौकशी सुरु असून चौकशीअंती संबंधित दोषी आढळल्यास त्यांचेविरुद्ध उचित कारवाई करण्यात येईल.

सन- २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील विशेष प्रसिद्धी मोहिमेंतर्गत होर्डिंग्जद्वारे करण्यात आलेल्या प्रसिद्धीचे मे.बेसिल प्रा.लि. (केंद्र शासनाचा उपक्रम) या संस्थेकडून निरीक्षण व मूल्यांकन करण्याकरीता देण्यात आलेला अंदाजित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे

| **अ.क्र.** | **विभागाचे नाव** | **कार्यालयीन आदेश दिनांक** | **रक्कम** |
|---|---|---|---|
| १ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | २२/०२/२०१९ | रु.२२,००,०००/- |
| २ | सार्वजनिक बांधकाम रस्ते सुरक्षा विभाग | ५/४/२०१९ | रु. ३,९३,६००/- |
| ३ | सामाजिक वनीकरण, पुणे | २५/७/२०१९ | रु. ४७,५०,०००/- |
| ४ | पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई | २६/८/२०१९ | रु. ७,५०,०००/- |
| ५ | इतर मागासवर्गीय विभाग, मंत्रालय, मुंबई | २६/८/२०१९ | रु.२२,३५,०००/- |
| ६ | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई | २६/८/२०१९ | रु. १६,२६,०००/- |
| ७ | सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, मंत्रालय, मुंबई | २६/८/२०१९ | रु.८,६८,५०,०००/- |
| ८ | अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय | २७/८/२०१९ | रु. २,८४,२८५/- |
| ९ | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | २६/९/२०१९ | रु. १५,००,०००/- |
| १० | राष्ट्रीय आरोग्य मिशन, पुणे | २०/१२/२०१९ | रु.३,५७,०४३/- |
| ११ | राष्ट्रीय आरोग्य मिशन, पुणे | २९/०१/२०२० | रु.४,९१,९४२/- |
| १२ | राष्ट्रीय आरोग्य मिशन, पुणे | ०१/०२/२०२० | रु.२,४५,८९६/- |
| १३ | राष्ट्रीय आरोग्य मिशन, पुणे | २०/०२/२०२० | रु.५९,३६६/- |
| १४ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | २५/०२/२०२० | रु.१९,६५,५१४/- |
| १५ | सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | ४/०३/२०२० | रु.८,९८,४८९/- |
| १६ | राष्ट्रीय आरोग्य मिशन, पुणे | १३/०३/२०२० | रु. ८,९०,८०४/- |
| १७ | गृह विभाग | २/९/२०२० | रु.१,६१,२१२/- |
| १८ | गृह विभाग | ४/९/२०२० | रु. ६,०७,३९८/- |
| १९ | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | २८/९/२०२० | रु.४,०८,६४८/- |
| २० | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | २७/१०/२०२० | रु.१,१६,५०६/- |
| २१ | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | २७/११/२०२० | रु. ४,८७,३०३/- |
| २२ | राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे | २९/१२/२०२० | रु.४,३९,१५१/- |
| २३ | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | २६/०२/२०२१ | रु.९,४६,५६५/- |
| २४ | महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, | २०/३/२०२१ | रु.८५,२७२/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | वरळी मुंबई | | |
| २५ | राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे | २०/३/२०२१ | रु.१,१२,७९५/- |
| २६ | कृषी दुग्ध विकास, पशुसंवर्धन व मत्स्यव्यवसाय विभाग मंत्रालय | २८/०३/२०२१ | रु.१,८०,२६४/- |
| २७ | राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे | ३१/३/२०२१ | रु.१४,१५१/- |

---

**पुणे महानगरपालिकेत कार्यरत असलेल्या कंत्राटी कामगारांबाबत**

**(१४) ५१९८२ (२०-०१-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य विभाग, घनकचरा व्यवस्थापन, उद्यान विभाग, पाणी पुरवठा, पथ, मोटार वाहन, सुरक्षा विभाग, विद्युत, मंडई, सांस्कृतिक केंद्र, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम निर्मुलन विभाग, अग्निशामक दल अशा एकूण २८ विभागातील कामे करण्यासाठी साडेआठ हजारपेक्षा जास्त कंत्राटी कामगार नियुक्त केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या कामगार व ठेकेदारांचा सर्वसाधारण तपशील काय आहे,

(३) असल्यास, कंत्राटी कामगारांच्या वेतन देणेकामी पुणे महानगरपालिकेकडून एकूण किती खर्च करण्यात आला आहे,

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) व (२) पुणे महानगरपालिकेच्या एकुण २५ विभागांमधून आवश्यतेनुसार एकुण ८९८८ कंत्राटी कामगारांची सेवा साधारण ४४ ठेकेदारांकडुन घेण्यात येत आहेत.

(३) कामाच्या आवश्यकतेनुसार घेण्यात आलेल्या ८९८८ कंत्राटी कामगारांना वेतन वइतर अनुषांसिक बाबींसाठी पुणे महानगरपालिकेकडून एका महिन्यामध्ये अंदाजे रु.१९,८४,१८,६३६/- इतका खर्च करण्यात आला आहे.

---

**मौजे पळसखेड भट (ता. जि. बुलडाणा) येथील धरणात गेलेला रस्ता बांधणेबाबत**

**(१५) ५२८२२ (२०-०१-२०२३). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे पळसखेड भट (ता. जि. बुलडाणा) येथील धरणात गेलेल्या जुन्या शेतरस्त्याच्या बदल्यात मिळालेल्या नविन शेतरस्त्यावर असलेल्या नाल्यावर बांधलेला पुल पुराच्या पाण्यात वाहून गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे मार्किंग करुन मिळण्याबाबत तसेच नविन रस्त्यामध्ये असलेल्या नदीवर पुल बांधण्याबाबतची मागणी श्री.ज्ञानदेव लक्ष्मण काळे रा.पळसखेड भट (ता.जि.बुलडाणा) यांनी दिनांक ०३ डिसेंबर, २०१४ दिनांक १८ जानेवारी, २०१५ तसेच दिनांक १८ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास स्मरणपत्राद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले तद्नुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे. सदर प्रकल्पाचे बांधकाम हे सन १९९५-९६ मध्ये लघु पाटबंधारे विभाग बुलडाणा यांचेमार्फत पुर्ण करण्यात आलेले असून दि.३०/०७/२०२१ रोजी या विभागाकडे हस्तांतरीत केलेला आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. नमूद दिनांकाची पत्रे उपलब्ध नसली तरी याबाबत दि.२७/११/२०१४, ०५/०१/२०१५,

२३/०२/२०१५ व २५/०६/२०१५ रोजीचे अर्ज कार्यकारी अभियंता, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांना प्राप्त झालेले आहेत. तसेच सदर प्रकल्प या विभागाकडे हस्तांतरण करतांना संबंधित मागणीबाबत धारिका या विभागाकडे प्राप्त झालेली नाही.

(३) सदर प्रकल्प हस्तांतरीत झालेल्या तारखेपासून सदर मागणीच्या अनुषंगाने स्थळ पाहणी केली असून संबंधित शेतकऱ्यांनी यापूर्वी वाहून गेलेल्या पुलाच्या ठिकाणी नवीन पुल बांधणेबाबत नकार दर्शविला आहे. त्यामुळे संबंधित शेतकऱ्यांनी सुचविल्याप्रमाणे मार्ग बदलून वाहून गेलेल्या पुलाच्या १०० मीटर उत्तरेस नवीन पुल बांधणेबाबत विनंती केलेली आहे. त्यानुसार नवीन पुलासाठी सर्वेक्षण करून अंदाजपत्रके तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिन्नर (जि.नाशिक) शहरासाठी सिन्नर नगरपरिषदेच्या अंतर्गत पाणीपुरवठा योजना सुरळीत न चालविल्याबाबत

**(१६) ५३३६२ (२२-०१-२०२३). ॲड.माणिकराव कोकाटे (सिन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिन्नर (जि.नाशिक) शहरासाठी सिन्नर नगरपरिषदेच्या अंतर्गत UIDSSMT योजनेअंतर्गत सुमारे ७२ कोटी रुपयाची पाणीपुरवठा योजना ३ वर्षापूर्वी पूर्ण करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू योजना हायड्रोटेस्टींग न करता सुरु केली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना आता नादुरुस्त असून व ही योजना सिन्नर नगरपरिषदेने अद्याप ताब्यात घेतलेली नसतांना या योजनेच्या दुरुस्तीसाठी किती निधी खर्च केलेला आहे,

(४) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व ही योजना ताब्यात न घेता त्याच्या दुरुस्तीसाठी खर्च करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) सिन्नर नगरपरिषदेस युआयडीएसएसएमटी योजनेंतर्गत रुपये ६६.३२ कोटी किंमतीची सिन्नर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती.

सिन्नर शहर वाढीव पाणीपुरवठा योजना स्काडा प्रणालीसह दिनांक ०१ ऑक्टोबर, २०२१ रोजी कार्यान्वित झालेली आहे.

(२) सिन्नर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचे प्रकल्प सल्लागार डी.आर.ए. नागपूर व त्रयस्थ संस्था अमृत वाहिनी तंत्रनिकेतन यांनी प्रमाणित केलेल्या अहवालाप्रमाणे संपूर्ण रायझिंग मेन, डीआय के९/एमएस, ग्रॅव्हिटी मेन डी.आय. के७ या मुख्य जलवाहिन्यांची पूर्ण तसेच वितरण व्यवस्थेमधील २५ किमी वितरण वाहिन्यांची जलदाब चाचणी घेण्यात आलेली आहे. तथापि, वितरण व्यवस्थेमधील ज्या वाहिन्यांवर नागरीकांद्वारा नळ जोडण्या घेण्यात आलेल्या आहेत अशा ४२ किमी वितरण वाहिन्यांची जलदाब चाचणी घेण्यात आलेली नाही.

(३), (४) व (५) सद्यस्थितीस सिन्नर शहर पाणीपुरवठा प्रकल्पांतर्गत शहरास सुरळीत पाणीपुरवठा सुरु आहे.

तथापि, योजना हस्तांतरण तारीख, ठेकेदाराचे देयक, सुरक्षा अनामत रक्कम राखून ठेवणे अशा बाबींमुळे ठेकेदाराने मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केलेली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तसेच, सदर प्रकल्पाकरिता वेळोवेळी उद्भवलेल्या देखभाल दुरुस्तीवर सिन्नर नगरपरिषद सर्वसाधारण सभा तसेच समुचित अधिकारी यांच्या मंजुरीने रुपये ४४,५९,६७४/- इतका खर्च करण्यात आलेला आहे.

---

### कुरुंदा (ता.वसमत, जि.हिंगोली ) परिसरातील शेतकऱ्यांना मदत करताना दुजाभाव होत असल्याबाबत

**(१७) ५३३७२ (२९-०१-२०२३). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुरुंदा (ता.वसमत, जि.हिंगोली) येथील शेतकऱ्यांसाठी दोन तलाठी सज्जा असल्याने कुरुंदा येथील सज्जातील शेतकऱ्यांना ८० ते १०० % बाधित क्षेत्र म्हणून अनुदान देण्यात आले मात्र याच गावातील दोन वाडा सज्जातील शेतकऱ्यांना केवळ ५० टक्के बाधित क्षेत्र म्हणून अनुदान देण्यात आल्याने एकाच गावातील शेतकऱ्यांना अनुदान देताना प्रशासनाने दुजाभाव केल्याने अनेक शेतकरी आपल्या हक्कापासून वंचित राहिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२२ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कुरुंदा व परिसरातील शेतकऱ्यांना मदत मिळत असताना सतत दुजाभाव होत असल्याने या गावातील सर्व शेतकरी एका सज्जात आणून त्यांना एक सारखीच मदत देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही,

कुरूंदा हे गाव नदीशेजारी असून या गावाच्या डोंगरमाथी कुरुंदा, डोणवाडा, सुकळी, सेलू व वर्ताळा इत्यादी गावाच्या डोंगर रांगातून कुरुंदा गावात व परिसरात जास्त प्रमाणात अतिवृष्टीचे पाणी साचल्यामुळे बाधित शेतीपिकांचे क्षेत्र जास्त प्रमाणात असल्यामुळे बाधित क्षेत्राच्या सर्वेक्षणानुसार अनुदान व वितरीत करण्यात आलेले आहे. तसचे मौजे डोणवाडा सज्जातील बाधित क्षेत्राप्रमाणे सर्वेक्षणानुसार अनुदान वितरीत करण्यात आले असून पात्र बाधित खातेदार हक्कापासून किंवा अनुदानापासून वंचित राहिलेला नाही.

(२) कुरुंदा तलाठी सज्जा व डोणगाव तलाठी सज्जा हे दोन वेगवेगळी तलाठी सज्जे आहेत. बाधित शेतकऱ्यांना बाधित क्षेत्राच्या सर्वेक्षणानुसार विहीत दराने व विहित मर्यादेत अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बहुर (ता.मावळ, जि.पुणे) येथिल स्थानिक भूमिपुत्रांना न्याय मिळण्याबाबत

**(१८) ५३४२६ (२२-०१-२०२३). श्री.सुनिल शेळके (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहुर (ता.मावळ, जि.पुणे) येथे स्थानिक भूमिपुत्रांकडून पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्प विरोधात दिनांक ९ ऑगस्ट, २०११ रोजी वा त्यासुमारास आंदोलन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेदरम्यान पोलीस प्रशासनाकडून आंदोलकांवर बेछूट गोळीबार करण्यात आला व यामध्ये ३ व्यक्ती मृत पावल्या असून १२ आंदोलक जखमी झाले होते. सदर मृतांच्या वारसांना नोकरी मिळाली असून, जखमींना शासन नोकरी देणार असे जाहीर करण्यात आले होते. परंतु या घटनेला अकरा वर्ष पूर्ण होऊ नये आंदोलनातील जखमींना अद्याप नोकरी मिळाली नसल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंदोलनात सहभागी आंदोलकांवरील गुन्हे मागे घेतले व प्रकल्पाला स्थगिती देण्यात आली असून याबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर आंदोलनातील जखमींना नोकरी देण्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे व ठराव पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने नगरविकास विभागाकडे दिनांक २४ जून २०१९ रोजी पाठविला असून, सदरहू प्रस्तावावर आजतागायत विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार पवना जलवाहिनी विरोधी आंदोलनातील जखमींना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ३ मृत आंदोलकांच्या वारसांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नियुक्ती देण्यात आली आहे. तथापि, पवना धरणातील आंदोलनामध्ये सामील झालेल्या १२ जखमींना / त्यांच्या वारसांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी नोकरी देणे नियमाधीन होणार नाही. त्यामुळे जखमी आंदोलकांच्या वारसांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर नियुक्ती देण्यात आलेली नाही.
(३) होय. हे खरे आहे.
(४) व (५) पवना धरणातील आंदोलनामध्ये सामील झालेल्या १२ जखमींना / त्यांच्या वारसांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कायमस्वरूपी नोकरी देणे नियमाधीन होणार नाही असा निर्णय घेण्यात आला आहे व तसे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस दि.२५.०४.२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

---

### पुणे महानगरपालिका हद्दीतील मौजे खराडी येथे बी.पी.डेव्हलपमेंट प्रा.लि. या कंपनीबाबत

**(१९) ५५२६७ (२७-०१-२०२३). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिका हद्दीतील मौजे खराडी येथे बी.पी.डेव्हलपमेंट प्रा.लि. या कंपनीद्वारे मिळकत क्र.४०, ४१, ५९ विकास काम केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंपनीकडे जागेच्या मालकी बाबत कोणतेही कागदपत्र नसताना पुणे महानगरपालिकेने बांधकाम प्रस्तावास दिनांक १८ जुलै, २०२२ रोजी मंजूरी दिली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास श्री.अनिल चौधरी यांनी दिनांक २ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास हरकत घेतली असून उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्या अनुषंगाने दोषी आढळणाऱ्या व्यक्तीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) अशंत: खरे आहे.
खराडी, स. नं. ४०, ४१,५९ मधील प्लॉट क्र.७ यावर पुणे बीपी डेव्हलपमेंट प्रा.लि. व मे.अजंता एटरप्रायजेस यांचेमार्फत विकसनाचे काम सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
जागेच्या मालकीबाबत कागदपत्रे पुणे महानगरपालिकेकडे सादर केली असून बांधकाम प्रस्तावास दिनांक १८.०७.२०२२ रोजी महानगरपालिकेने मान्यता दिली आहे.
(३) तक्रार अर्जाच्या अनुषंगाने संबंधितांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली आहे.
(४) सदरचे ले-आऊटमधील विवादीत स.नं.४१/१अ/१ब या क्षेत्रामधील प्लॉट क्र.१७ करीता प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवणेचा आणि स. नं.५९ या क्षेत्रामधील प्लॉट क्र.७ करीता देण्यात आलेली काम थांबवा नोटीस मागे घेण्याचा निर्णय झालेला असून, प्लॉट क्र.१७ करिता अद्याप कोणतीही मंजुरी दिली नसल्याने पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्नच उद्भवत नाही.

---

## अंबाजोगाई (जि.बीड) शहराचा अमृत टप्पा-२ अंतर्गत पाणीपुरवठा व भुयारी गटार योजनेत समावेश करण्याबाबत

**(२०) ५६३५४ (२७-०१-२०२३). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबाजोगाई (जि.बीड) शहराची सध्याची लोकसंख्या जवळपास २.०० लक्ष असून शहरासाठी सन १९९८ मध्ये धनेगाव येथील मांजरा प्रकल्पावरून पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अंबाजोगाई शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत असल्याने तसेच स्थानिकांना १० ते १२ दिवसाआड करण्यात येत असलेला पाणीपुरवठा या योजनेतंर्गत अपुरा पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी अंबाजोगाई शहरासाठी अमृत टप्पा-२ अंतर्गत पाणीपुरवठा व भुयारी गटार योजनेत समावेश करून मंजुरी देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी नगरविकास मंत्री यांचेकडे दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) हे अंशतः खरे आहे.

अंबाजोगाई शहरास मांजरा प्रकल्प, धनेगाव व काळवटी साठवण तलाव या दोन योजनांद्वारे शहरास पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

अंबाजोगाई शहरास अंबाजोगाई नगरपरिषदमार्फत सात दिवसआड याप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येतो तथापि, पाणीपुरवठा योजनेत काही तांत्रिक बिघाड झाल्यास पाणी वितरणावर परिणाम होऊन पाणी वितरणास विलंब होतो.

(३) होय हे खरे आहे.

(४) व (५) सन्माननीय विधानसभा सदस्यांच्या पत्राच्या अनुषंगाने अंबाजोगाई नगरपरिषद क्षेत्रातील पाणीपुरवठा व भुयारी गटार प्रकल्प केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत विचारात घेण्याच्या अनुषंगाने सदर अभियानाच्या शासन निर्णयातील नमूद कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याच्या सूचना मुख्याधिकारी, अंबाजोगाई नगरपरिषद यांना देण्यात आलेल्या आहेत.

---

## पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात PMP बसेससाठी पार्किंगला जागा उपलब्ध नसल्याबाबत

**(२१) ५६५३० (२४-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात PMP बसेसच्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध नसल्याने PMP च्या बसेस रस्त्यांवर सर्वत्र खाजगी निवासी संकुलासमोर, शाळा, रुग्णालयासमोर आणि वेगवेगळया व्यापारी संकुलासमोर इतरत्र उभ्या केल्या जात असल्याने नागरिकांना त्रास होऊन वारंवार वाहतूक कोंडी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या क्षेत्रात PMP बसेसच्या पार्किंगसाठी वेगळी जागा उपलब्ध करण्याबाबत काही प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावातील शिफारशींचा तपशील काय आहे व त्यानुषंगाने या प्रकरणी अंतिम निर्णय होऊन PMP बसेसच्या पार्किंगसाठी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या बसेस पार्किंग करीता जागेची कमतरता असल्याने काही प्रमाणात नतावाडी डेपो, कात्रज डेपो, मार्केटयार्ड डेपो, स्वारगेट डेपो इ. परिसरात तसेच मनपा भवन लगत रात्रीच्या वेळेस रस्त्याच्या कडेला बसेस पार्क केल्या जातात ही वस्तु:स्थिती आहे.
(२) पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत पुणे व पिंपरी चिंचवड महानगपालिका व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडे विकास आराखडयात पीएमपीएमएल करीता आरक्षित असलेल्या जागा देणेबाबतची मागणी वेळोवेळी करण्यात आलेली आहे.
(३) महानगरपालिका व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून काही जागा महामंडळाच्या वापरासाठी मासिक भाडेतत्वावर महामंडळास बस पार्किंग बस डेपोसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत. तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे रावेत, भोसरी-मध्यवर्ती सुविधा केंद्र व मोशी येथील आरक्षीत जागा बस पार्किंगसाठी महामंडळास उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई गोवा महामार्गाला समांतर असलेल्या रेड्डी ते रेवस या सागरी महामार्गाचे प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत

**(२२) ५६५८५ (२८-०४-२०२३). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शेखर निकम (चिपळूण), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गाला पर्याय म्हणून ५४० कि.मी. लांबीचा रेड्डी ते रेवस सागरी महामार्ग बांधण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी नेमलेल्या एजन्सीने सर्वेक्षणाचा अहवाल शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या सागरी महामार्गावरील शिर्से ते दांडा पूलाची दुरुस्ती, जैतापूर-चिरेखाण-आंबेरी पुलापर्यंतचा रस्ता दुरुस्ती तसेच डोंगरतिठा ते सांगने तसेच आगरदांडा, बागमांडला, बाणकोट, कारंजा, रेवस येथील जोड रस्त्यांची कामे अद्याप प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरच्या सागरी महामार्गामुळे समुद्र किनाऱ्यावरील गावे व शहरे जोडली जाऊन पर्यटनाला चालना मिळून राज्यात रोजगार निर्मीती होऊन मुंबईहून तळकोकणात जाण्याचे अंतर देखील कमी होणार असून सदर प्रकल्पास ९ हजार कोटीची आर्थिक तरतूद देखील करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर कामास निधी उपलब्ध करुन रेड्डी ते रेवस या सागरी महामार्गाचे प्रलंबित काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
रेवस ते रेड्डी या महामार्गाची सुधारणा करण्यात येणार आहे.
(२) सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल एकूण ४ भागात करण्यात येत आहे. त्यापैकी भाग १ रेवस ते मुरुड जंजिरा या ८० कि.मी. लांबीचा प्रकल्प अहवाल सल्लागाराने सादर केल्यानंतर तो शासनास प्रशासकीय मान्यतेसाठी सादर झालेला आहे. तसेच प्रकल्प लांबीतील खाडीवरील मोठ्या ९ पुलांपैकी पहिल्या दोन पॅकेजमधील ६ पूलासाठीचे

प्रकल्प अहवाल शासनास मान्यतेसाठी प्राप्त झाले आहेत. उर्वरीत लांबीतील सविस्तर प्रकल्प अहवालाचे काम सल्लागारामार्फत सुरु आहे.

(३) या महामार्गाच्या आखणीतील आगरदांडा, रेवस-कारंजा या पूलांचे जोड रस्त्यासहित बांधकामासाठीचे प्रकल्प अहवाल प्राप्त असून त्यानुसार शासनास मान्यतेसाठी सादर झालेले आहेत. त्यापैकी रेवस-कारंजा जोड रस्त्यास प्रशासकीय मान्यता प्राप्त असून त्याची निविदा विषयक कार्यवाही प्रगतीत आहे.

(४) सदर प्रकल्पासाठी अद्याप आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही.

(५) याबाबत चौकशी करण्याची आवश्यकता नाही. रेवस-कारंजा या पुलासाठी रुपये ३०७५ कोटी व केळशी पुलासाठी रुपये १४८.४३ कोटी इतक्या रक्कमेची प्रशासकिय मान्यता प्राप्त झाली असून निविदा कार्यवाही प्रगतीत आहे.

उर्वरीत बाबी वरील प्रश्नांचे उत्तराप्रमाणे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या आरोग्याची काळजी तसेच निवासाची व्यवस्था करण्यासाठी राबविण्यात येणारी आश्रय योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(२३) ५६६३० (२४-०४-२०२३). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नितेश राणे (कणकवली), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेत हजारो सफाई कामगार वर्षांनुवर्षे शहरातील घाण साफ करणे, गटार साफ करणे अशी कामे त्यांच्यामार्फत केली जात असून दिवसरात्र मेहनत करीत असलेल्या सफाई कामगारांच्या आरोग्याकडे महानगरपालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचरा साफ करताना तसेच गाडीत भरताना सफाई कामगारांना खूपच मेहनत करावी लागत असल्यामुळे महानगरपालिकेने कचरा वेगळा करण्यासाठी परदेशात जे तंत्रज्ञान वापरले जाते ते मुंबईत अंमलात आणण्याची मागणी अनेक सेवाभावी संघटनांकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांसाठी उभारण्यात येणाऱ्या मालकी हक्कांच्या घरांच्या योजनेचे काम अतिशय संथगतीने सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबई शहराची दिवसरात्र स्वच्छता राखत असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या सफाई कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी त्याचप्रमाणात त्यांच्या निवासाची व्यवस्था करण्यासाठी राबविण्यात येणारी आश्रय योजना प्रभावीपणे राबविण्याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२३) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांना सफाईचे काम करण्याकरिता मास्क, परावतीत जॅकेट, हातमोजे, गमबुट, सेफ्टी शूज, सॅनिटायझर, साबण इत्यादी सुरक्षा साधने देण्यात येत आहेत.

सदर सफाई कामगारांची वर्षातून दोन वेळा आरोग्याची चाचणी करुन उपचार केले जातात. तसेच त्यांच्याकरिता कुटुंब आरोग्य विम्याच्या रकमेची प्रतिपूर्ती केली जाते.

(२) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात घरोघर कचरा संकलनासाठी चाक असलेले सुविधाजनक १२०-१४० लि. क्षमतेचे

हलक्या वजनाचे प्लास्टिकचे डबे वापरले जातात. तसेच डब्यातील कचरा गाडीत जमा करण्याकरिता गाडीवर स्वयंचलित यंत्रणा आहे.

(३) हे खरे नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेत सुमारे २७,९०० सफाई कामगार कार्यरत असून, त्यापैकी केवळ सुमारे ५५९२ सफाई कामगारांना सेवानिवासस्थाने देण्यात आलेली आहेत. सदर सेवानिवासस्थाने ही बरीच जुनी व १५० चौ. फुट ते १९० चौ. फुट असे कमी चटईक्षेत्र असल्यामुळे तसेच इतर सफाई कामगारांना देखील सेवा सदनिका प्राप्त होण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आश्रय योजना राबविण्यात येत आहे.

सदर आश्रय योजनेंतर्गत सफाई कामगारांच्या सेवानिवासस्थानांच्या पुनर्विकासाचे काम प्रगतीपथावर असून पुनर्विकासांतर्गत अंदाजे १२ हजार सेवासदनिका उपलब्ध होणार आहेत.

सदर सफाई कामगारांच्या चाळींच्या पुनर्विकासाचे काम पूर्ण होईपर्यंत त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेकरिता रु. १४ हजार इतका विस्थापन भत्ता व अधिक रु. ६ ते ७ हजार पर्यंत घरभाडे भत्ता असे एकूण रु. २० ते २१ हजार प्रतिमाह अतिरिक्त रक्कम देण्यात येत आहे. तसेच रु. ७५ हजार इतकी रक्कम परतावा आधारावर एकरकमी देण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे लासलगाव व विंचूर (ता.निफाड जि.नाशिक) येथील नदीवरील जलाशयांचे संवर्धनासाठी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत**

**(२४) ५६७२२ (२६-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लासलगाव व विंचूर (ता.निफाड जि.नाशिक) येथील नदीवरील जलाशयाचे संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेमधून प्रशासकीय मान्यता मिळण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक २ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १७ मार्च, २०२२ रोजी राज्य नदी संवर्धन योजनेच्या सचिव प्रदत्त समितीने लोणगंगा नद्यांच्या जलाशयाचे संवर्धनासाठी राज्य सरोवर संवर्धन योजनेसाठी नदी संवर्धनाचा परिपूर्ण प्रस्ताव नाशिक जिल्हा परिषदेने पाठवावा असा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील शिवनदी व लोणगंगा नदीवरील जलाशयाचे संवर्धन करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांचेकडून परिपूर्ण प्रस्ताव मागवून राज्य सरोवर संवर्धन योजनेमधून या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नाशिक यांच्या दि.१८.०२.२०२३ रोजीच्या पत्रासोबत शिवनदी व लोणगंगा नदीवरील जलाशयाचे संवर्धन करण्याचे प्रस्ताव विभागास प्राप्त झाले असून पर्यावरण विभागाच्या दि.०१.०३.२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक जिल्ह्यात जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभागातील शाखा अभियंत्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२५) ५६९३१ (२६-०४-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यात जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण यांचे अधिनस्त असलेल्या शाखा अभियंत्यांची १२ पदे रिक्त असल्यामुळे जिल्ह्यातील जलसंधारणाच्या कामांवर विपरीत परिणाम होत असल्यामुळे ही रिक्त पदे प्राधान्याने भरण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक ७ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर शाखा अभियंत्यांची रिक्त भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०६-२०२३) :** (१) होय
(२) मृद व जलसंधारण हा नवीन प्रशासकीय विभाग असल्याने विभागात मूळातच जलसंधारण अधिकारी (शाखा अभियंता/सहायक अभियंता श्रेणी-२/कनिष्ठ अभियंता) संवर्गातील पदांची संख्या मंजूर पदांपेक्षा खूप कमी होती. त्यानंतर विभागाने आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) यांच्यामार्फत सरळसेवेने जलसंधारण अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) (कनिष्ठ अभियंता) संवर्गातील २४२ पदांची भरती केलेली आहे. विभागामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे जलसंधारण अधिकारी, गट-ब (राजपत्रित) (सहायक अभियंता श्रेणी-२) संवर्गातील १९४ पदांचे मागणीपत्र सादर केले होते. त्यानुषंगाने आयोगाकडून १९४ शिफारस पात्र अधिकारी प्राप्त झाले असून त्यापैकी पात्र ठरलेल्या १५९ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.
तसेच आता राज्य शासनाचा स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात ७५ हजार रिक्त पदे भरतीचा मानस असून त्यानुषंगाने या विभागामार्फत जलसंधारण अधिकारी संवर्गातील ६७० रिक्त पदे भरतीचा कार्यक्रम जाहीर केला असून त्यानुषंगाने आयुक्त, मृद व जलसंधारण, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून जाहीरात प्रसिद्ध करून परिक्षेचे आयोजन करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### पिंपरी-चिंचवड परिसरातील (जि.पुणे) भोसरी-चाकण नियो मेट्रोच्या डीपीआरबाबत

**(२६) ५७३४० (२४-०४-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोसरी ते चाकण या १६.११ किलोमीटर अंतराच्या नियो मेट्रो मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) मंजुरीसाठी शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रस्तावातील बदल/सूचना यांचा सर्वसाधारण तपशील काय आहे,
(३) असल्यास, प्रस्तावास मान्यता देण्यास होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,
(४) तसेच या प्रकरणी अंतिम निर्णय होऊन भोसरी ते चाकण निओ मेट्रो मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यास शासनास किती कालावधी लागणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१), (२), (३) व (४) महा मेट्रोने दिनांक १३.१२.२०२२ रोजी भोसरी डिस्ट्रिक्ट सेंटर ते चाकण या मार्गिकेचा मेट्रोनियोचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) दिनांक १३.१२.२०२२ रोजी पिंपरी चिंचवड महागनगरपालिकेला मंजुरीसाठी सादर केला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेबरोबर विविध विषय समितींचा पदावधी दि १३.०३.२०२२ पासून संपुष्टात आला आहे. त्यामुळे नियो मेट्रो प्रकल्पाच्या डीपीआरचे सादरीकरण पदाधिकारी यांचेकडे सादर करणे शक्य झाले नाही. तथापि, शहरातील आमदार व इतर पदधिकारी याचे मागणी व सूचनानुसार भोसरी चाकण मार्गावर मेट्रो नियो प्रणाली ऐवजी रेग्युलर मेट्रो प्रकल्पाकरीता

डीपीआर तयार करावा असे मत आहे. त्यानुसार सदर डीपीआरचे सादरीकरण शहरातील आमदार, खासदार व इतर पदाधिकाऱ्यांकडे केल्यानंतर त्यांच्या सूचनांचा डीपीआरमध्ये अंतर्भाव करणेबाबत महामेट्रोला कळविण्यात येईल. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेची मंजुरी मिळाल्यानंतर सदर डीपीआर मान्यतेस्तव सादर करण्यात येईल.

---

## पुणे शहरातील सनसिटी रोड ते ३० मीटर डीपी रस्ता (कर्वेनगर) दरम्यान मुठा नदीवर पूल बांधण्याचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(२७) ५७३४१ (२४-०४-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील सनसिटी रोड ते ३० मीटर डीपी रस्ता (कर्वेनगर) दरम्यान मुठा नदीवर पूल बांधण्यात येणार असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पुलाच्या कामाचे कार्यादेश देण्यात आले असताना प्रत्यक्षात काम सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात निधी उपलब्ध करून दिला असून या पुलासाठी महापालिकेच्या सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षामध्ये ५ कोटी रुपयांची तर प्रकल्पीय तरतूद ५१ कोटी रुपयांची असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्यानुषंगाने सदरच्या पुलाचे काम तातडीने सुरु करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) होय, अशंत: खरे आहे.

खराडी, स. नं. ४०, ४१, ५९ मधील प्लॉट क्र.७ यावर पुणे बीपी डेव्हलपमेंट प्रा.लि. व मे.अजंता एटरप्रायजेस यांचेमार्फत विकसनाचे काम सुरु आहे.

(२) नाही. हे खरे नाही.

जागेच्या मालकीबाबत कागदपत्रे पुणे महानगरपालिकेकडे सादर केली असून बांधकाम प्रस्तावास दि. १८/०७/२०२२ रोजी महानगरपालिकेने मान्यता दिली आहे.

(३) तक्रार अर्जाच्या अनुषंगाने संबंधितांची एकत्रित सुनावणी घेण्यात आली आहे.

(४) सदरचे ले-आऊटमधील विवादीत स.नं.४१/१अ/१ब या क्षेत्रामधील प्लॉट क्र.१७ करीता प्रस्ताव तुर्त स्थगित ठेवणेचा आणि स.नं.५९ या क्षेत्रामधील प्लॉट क्र.७ करीता देण्यात आलेली काम थांबवा नोटीस मागे घेण्याचा निर्णय झालेला असून, प्लॉट क्र.१७ करिता अद्याप कोणतीही मंजुरी दिली नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## राजापूर (जि.रत्नागिरी) येथे बांधण्यात आलेल्या मच्छीमार्केटमधील व्यावसायिक गाळ्याबाबत

**(२८) ५७५६४ (२४-०४-२०२३). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) नगर परिषदेने वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून सुमारे ७८ लाख रुपये खर्च करुन सन २०१५-१६ मध्ये मच्छीमार्केट उभारुन त्यामध्ये आठ व्यावसायीक गाळे बांधण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गाळे भाड्याने घेण्यासाठी भरावयाची अनामत रक्कम "ना परतावा" तसेच अनामत रक्कम भरमसाठ असल्याने या जाचक अटीमुळे अद्याप एकही गाळा भाड्याने गेलेला नसल्याने लाखो रुपये खर्चून बांधण्यात आलेले गाळे गत काही वर्षापासून बंद स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गाळ्याच्या खर्चाचे ऑडिट करुन संबंधित यंत्रणांकडून सामान्य जनतेचा पैसा व्याजासह वसूल करण्यात यावा अशी मागणी अनेक स्वयंसेवी संस्थांनी नगरपरिषद प्रशासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) राजापूर नगरपरिषदेने वैशिष्टपूर्ण योजनेतून उभारलेल्या गाळयांचे भाडे मुल्यांकन त्रिसदस्यीय समितीकडून करुन घेण्यात आले होते. सदरचे गाळे भाडे तत्वावर देण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असता निर्धारित भाडयाची रक्कम व नापरतावा अनामत रक्कम जास्त असल्याचे कारण नमूद करुन नागरीक/ व्यापाऱ्यांकडून त्यास अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे सदर गाळयाचे भाडे रक्कम व अनामत रक्कम कमी करुन मिळणेबाबतचा प्रस्ताव त्रिसदस्यीय समितीकडे सादर करण्याची कार्यवाही नगरपरिषदेच्या स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर दुचाकी वाहनांना लागणारे इंदोरी सायलेन्सरची विक्री सुरु असल्याबाबत

**(२९) ५७५९६ (२५-०४-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात मोठ्या प्रमाणावर बुलेट या दुचाकी वाहनांना इंदोरी सायलेन्सर तयार करून सर्रास विक्री सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इंदोरी सायलेन्सर लावून बुलेटचा आवाज नेहमीपेक्षा जास्त असल्याने अन्य वाहनांचे लक्ष विचलित होऊन अपघात घडत असून प्रामुख्याने सिंहगड रस्त्यावर हे प्रमाण सर्वाधिक असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, बुलेटचे सायलेन्सर वाजविणाऱ्यावर कारवाईसह हे सायलेन्सर उत्पादन करणाऱ्या तसेच विक्री करणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याने हे प्रकार वारंवार घडत असल्याचे ही निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) दि.१०.१२.२०२२ रोजी वृत्तपत्रामध्ये अशा आशयाची बातमी प्रसिद्ध झाली आहे.
(२), (३) व (४) पुणे वाहतूक शहर पोलीस विभाग व प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या वायुवेग पथकांमार्फत मोटान वाहन कायदा,१९८८ च्या तरतुदी व भादंवि,२८३, महाराष्ट्र पोलीस ॲक्ट कलम,१०२ अन्वये सायलेन्सरची विक्री करणाऱ्या एकूण १९ विक्रेत्यांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १९४ अन्वये नोटीस जारी करण्यात आल्या आहेत. तसेच सायलेन्सरमध्ये बदल करून कर्णकर्कश आवाज करणाऱ्या ३७३६ वाहनांवर डिसेंबर,२०२२ ते १०.०५.२०२३ पर्यंत कारवाई करण्यात आली असून ५५ वाहनधारकांचे अनुज्ञप्ती निलंबन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेतील घोरपडी पेठेतील महानगरपालिकेच्या इमारती पाडल्याने तेथील कुटुंबे बेघर झाल्याबाबत

**(३०) ५७९१० (२४-०४-२०२३). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने घोरपडी पेठेतील महापालिकेतील चतुर्थ श्रेणीतील सेवक वर्गासाठी बांधलेल्या आठ व नऊ नंबर वसाहतीमधील दोन इमारती, नवीन इमारत बांधण्यासाठी दीड वर्षापूर्वी पाडल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारती पाडल्यामुळे इमारतीमध्ये राहणाऱ्या बेघर झालेल्या रहिवाशांना राहण्याची सोय नसल्यामुळे सदर रहिवाशांनी बापूसाहेब पाटोळे या उद्यानाचा आश्रय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून या बेघर नागरिकांना निवारा देण्यासाठी व नवीन इमारती लवकरात लवकर बांधण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) पुणे महानगरपालिकेच्या घोरपडे पेठेतील वसाहत क्र.८ याठिकाणची कोणतीही इमारत पाडण्यात आलेली नाही. पुणे महानगरपालिकेच्या घोरपडे पेठेतील वसाहत क्र.९ मधील 'डी' व 'एफ' या दोन इमारती धोकादायक झाल्याने सन २०२१ मध्ये या इमारती अति. महापालिका आयुक्त (ज) यांच्या दि. १४.१०.२०२१ च्या मान्यतेने दि.१८.१०.२०२१ रोजी चाळ विभागामार्फत उतरविण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर वसाहत क्र.९ मधील इमारत क्रमांक 'डी' मधील रहिवाशांची बापूसाहेब पाटोळे उदयान मधील सांस्कृतिक हॉलमध्ये तात्पुरत्या निवाऱ्याची सोय उपलब्ध करुन दिलेली होती. सद्यास्थितीमध्ये बापुसाहेब पाटोळे मध्ये कोणीही रहिवाशी वास्तव्यास नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविलेआहे.

(३) वसाहत क्र. ९ येथील इमारत क्र. डी, ई व एफ येथील होणाऱ्या मोकळया जागेत नवीन इमारत बांधण्याचे नियोजन आहे. निविदा मागविण्यात आल्या असून निविदा मान्यतेच्या प्रक्रियेत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सिंधुदुर्ग जिल्हयातील शहरांमध्ये नवीन नळयोजना कार्यान्वित करुन पाणीपुरवठा करण्याबाबत

**(३१) ५७९३० (२४-०४-२०२३). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील शहरांमध्ये विविध ठिकाणच्या नळपाणी योजनांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत असून, काही ठिकाणी जुन्या नळपाणी योजना बंद झाल्यामुळे पाण्याचा अपव्यय अधिक होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील नागरिकांना पाणीपुरवठा सुरळीत व पुरेसा होण्याकरीता उभारण्यात आलेल्या पाण्याच्या साठवण टाक्यांची स्वच्छता करण्यासाठी नगरपरिषदेकडे पुरेसा निधी नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नवीन नळयोजना कार्यान्वित करण्याबाबत तसेच पाण्याच्या टाक्या स्वच्छ करुन शहरांना पाणी पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) सिंधुदुर्ग जिल्हयातील नगरपरिषदा/ नगरपंचायतीमार्फत पाण्याच्या साठवण टाक्यांची स्वच्छता वेळोवेळी करण्यात येते. तथापि मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने याप्रकरणी आवश्यक ती दक्षता घेण्याचे निर्देश संबंधितांना देण्याच्या सूचना जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना देण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाण्यातील टिकुजीनी वाडी ते मुंबईतील बोरिवली-मागाठाणे दरम्यान दुहेरी बोगद्याच्या बांधकामाबाबत**

**(३२) ५८१४० (२५-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाण्यातील टिकुजीनी वाडी ते मुंबईतील बोरिवली-मागाठाणे दरम्यान दुहेरी बोगदा ४ वर्षात बांधण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्यामुळे किती खर्च येणार आहे व यामुळे ठाणे-बोरिवली किती अंतर कमी होणार आहे ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
सदर प्रकल्पाचे बांधकाम पुढील पाच वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(२) सदर दुहेरी बोगद्याच्या बांधकामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने आपल्या १५४ व्या बैठकीत एकूण रु १६६००.४० कोटी (भूसंपादनासह) खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर दुहेरी बोगद्याच्या बांधकामामुळे ठाणे ते बोरीवली हा प्रवास १२ कि.मी. ने कमी होईल.

---

**मुंबईतील सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडचे काम करतांना सुरक्षामानक व नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत**

**(३३) ५८१६१ (२४-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सांताक्रुझ-चेंबूर लिंक रोडवर अनेक दिवसांपासून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत उड्डाणपुल, उन्नत मार्ग, रस्ता रुंदीकरण, मेट्रो रेल्वे इत्यादि कामे सुरु असून सदर कामे करतांना संबंधित विभागाकडून सुरक्षामानक व नियमांचे उल्लंघन होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मार्गावर माहे फेब्रुवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मुंबई विद्यापीठाचे प्रवेशद्वार व ग्रॅण्ड हयात हॉटेल रोडच्या जंक्शन जवळ एका मोटार कारने धडक दिल्यामुळे श्री.लॉरेन्स बरेटो या मोटार बाईक स्वाराचा व दिनांक १३ जानेवारी, २०२३ रोजी पहाटेच्या सुमारास दुधाच्या गाडीला स्कुटर धडकून स्कुटरस्वार महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने अपघातांची चौकशी करुन यास जबाबदार असणारे तसेच सुरक्षा मानक व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) हे, खरे नाही.
विस्तारीत सांताक्रुझ चेंबूर लिंक रोडचे काम अभियांत्रिकी विभागाकडून प्रगतीपथावर असून, प्रकल्प स्थळावर सुरक्षामानक व नियमांचे पालन करुन कामे करण्यात येत आहे.
(२) व (३) होय हे खरे आहे. सह पोलिस आयुक्त, (का. व सु.) मुंबई यांनी कळविल्यानुसार दिनांक २५ फेब्रुवारी,

२०२२ रोजी अज्ञात चारचाकी वाहनाच्या धडकेमुळे श्री. लॉरेन्स बोरेट्टो यांना नायर रुग्णालयात दिनांक २६ फेब्रुवारी, २०२२ रोजी मयत घोषित करण्यात आले, तर दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी श्रीमती पायल गिरधर वालेचा दुचाकी वरुन जात असता, वाहन चालक श्री. शिवजतन शितलप्रसाद यादव याने बेदरकारपणे चारचाकी वाहन चालवून, दूचाकीला धडक दिल्यामुळे अपघातग्रस्त महिलेला व्ही. एन. देसाई हॉस्पिटल येथे दाखल केले असता, तिला मयत घोषित करण्यात आले आहे. उपरोक्त दोन्ही अपघात हे वाहनचालकांच्या निष्काळजीपणाने वाहन चालविण्यामुळे घडले असल्याचे दिसून येत आहे.

उपरोक्त दोन्ही अपघातापैकी अज्ञात चारचाकी वाहनचालक फरार असून त्यांच्याविरुध्द तसेच दुसऱ्या अपघातातील वाहनचालक श्री. शिवजतन यादव यास अटक करण्यात आली असून, दोघांविरुध्द भा.दं.वि. कलम ३०४ (अ), २७९ सह १३४ (अ)(ब) मो.वा.का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, पुढील तपास चालू आहे. उपरोक्त दोन्ही अपघात प्रकरणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने चौकशी केली असता, ते सांताक्रुझ चेंबूर लिंक रोडच्या आखणी बाहेर झाल्याचे दिसून येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील भोकरदन तालुक्यात अवकाळी व परतीच्या पावसामुळे कापसाचे उत्पादन घटल्याबाबत

**(३४) ५८३९८ (२२-०४-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भोकरदन तालुक्यात कापूस उत्पादक शेतकरी अवकाळी व परतीच्या पावसामुळे कापसाचे उत्पादन घटल्याने हवालदिल झाले आहे, त्यातच माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान शासनाने बाहेर देशातून कापसाच्या गाठी आयात केल्याने बाजारपेठेत मंदी निर्माण झाल्यामुळे कापसाच्या दरात घट होऊन कापसाला ८ हजार २०० रुपयांचा भाव दिला जात असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कपाशीच्या भावात अपेक्षित वाढ होत नसल्याने अनेक शेतकऱ्यांच्या वेचणीचा हजारो क्विंटल कापूस तसाच पडून असल्याने शेतकरी आर्थिकदृष्टया अडचणीत आला असून त्या भावास खाजगी व्यापाऱ्यांकडे कापूस विक्री करण्यास भाग पडल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत दखल घेऊन शेतकरी बांधवांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी तसेच त्यांची आर्थिक पिळवणूक थांबविण्यासाठी कोणती खबरदारी व उपाययोजना प्रशासकीय पातळीवर घेण्यात येऊन भविष्यात शेतकऱ्यांच्या हितासाठी निर्णय घेऊन धोरण आखले जाणार आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) व (२) माहे सप्टेंबर व ऑक्टोबर २०२२ या कालावधीत अतिवृष्टी / सततचा पाऊस यामुळे भोकरदर तालुक्यात कापूस पिकाखालील २१७४४ हेक्टर क्षेत्र बाधित झालेले आहे.

तसेच डिसेंबर, २०२२ मध्ये अल्प प्रमाणात कापूस गाठी आयात झाल्या. त्यामुळे कापसाच्या दरात घट झाली हे अंशत: खरे आहे. मात्र, कापसाचे दर हे राज्यात वा देशांतर्गत कापूस पिक परिस्थिती तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील दर यावर अवलंबून असतात.

कापूस हंगाम २०२२-२३ करीता केंद्र शासनाने लांब धाग्याच्या कापसासाठी रु.६,३८०/- प्रति क्विंटल व मध्यम धाग्याच्या कापसासाठी रु.६०८०/- प्रति क्विंटल इतका हमी दर जाहिर केलेला आहे. हंगामाच्या सुरूवातीला खाजगी बाजारपेठेत कापसास केंद्र शासनाने जाहिर केलेल्या हमी दरापेक्षा ४० ते ५० टक्क्याने दर मिळाले होते. आजमितीस खाजगी बाजारपेठेत गुणवत्तेनुसार कापसाचे दर प्रति क्विंटल रु.७,७००/- ते रु. ८,०००/- इतके आहेत.

(३) व (४) कापसाला खुल्या बाजारात केंद्र शासनाने जाहिर केलेल्या दरापेक्षा जास्त दर प्राप्त होत असल्याने शेतकऱ्यांचा हमी दराने कापूस विक्रीचा कल नाही. तथापि, केंद्र शासनाचे मुख्य अभिकर्ता भारतीय कपास निगम मर्या. (सीसीआय) व त्यांचे उपअभिकर्ता (सबएजंट) म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ यांनी हमी दराने कापूस खरेदीचे नियोजन केलेले असून हमी दराने कापूस खरेदी करण्यासाठी सदर शासकिय यंत्रणा सज्ज आहेत.

तसेच राज्यातील खुल्या बाजारात कापसाचे दर स्थिर राहण्याचे दृष्टीने सीसीआयकडून राज्यात स्पर्धात्मक दराने कापूस खरेदी करण्यात आला आहे.

अतिवृष्टीमुळे कापूस पिकाखालील बाधीत झालेल्या क्षेत्राचे पंचनामे करण्यात आलेले असून बाधित झालेल्या शेतकऱ्यांना, महसूल व वन विभागाच्या दिनांक १७.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मदत जाहिर करण्यात आली असून त्यानुसार शेतकऱ्यांना निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकवासला (ता.हवेली, जिल्हा पुणे) धरणाच्या हद्दीतील अवैधरीत्या रेस्टॉरंट व इतर व्यावसायिक स्वरूपाचे बांधकाम केल्याबाबत

**(३५) ५९०४५ (११-०५-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (ता.हवेली, जिल्हा पुणे) धरणाच्या हद्दीतील सर्व्हे नं.६५, मौजे कुडजे येथे झापूर्झा कला आणि संस्कृती संग्रहालयात अवैधरीत्या रेस्टॉरंट व इतर व्यावसायिक स्वरुपाचे बांधकाम झाल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएमआरडीएच्या माध्यमातून आवश्यक परवानग्या ह्या अर्धवट स्वरूपाच्या असतांना बेकायदेशीरपणे व्यावसायिक बांधकामे केली असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील जा.क्र.बीएचए/मौ. कुडजे/ग.नं. ६३ पै व इतर /प्र.क्र.६४८/१८-१९, दि. ०३./११/२०१८ रोजी विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. तसेच जा. क्र. बीएचए/मौ. कुडजे/ग.नं. ६३ पै व इतर /प्र.क्र.२९९/२१-२२, दि. १७/११/२०२१ अन्वये सुधारीत विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

(२), (३) व (४) ब्लॉक ए व बी मध्ये ऑफिस, दुकान आणि तिकिट घर इत्यादी व ब्लॉक सी व डी मध्ये ए.व्ही.एम. रुम, कॉन्फरन्स हॉल, गॅलरी इत्यादी तर ब्लॉक क्यु. आर. एस. मध्ये डिस्प्ले एरिया -१ बँक्वेट हॉल, डिस्प्ले एरिया -२ ऑडिटोरीयम सभागृहे अनुक्रमे ब्लॉक यु मध्ये कॅफेटेरिया व किचन स्टोअर इत्यादी बाबींचा समावेश आहे. तसेच ब्लॉक आर-१ ते ६ पर्यंत रहिवास युनिट व लॉन, नॅचरल ट्रेल आणि ओपन ॲम्पीथिएटर इत्यादी बाबींचा समावेश आहे. त्याकरीता प्राधिकरणामार्फत जा.क्र. २९९ दिनांक ०२/०९/२०२२ अन्वये जागा पाहणी करुन भागश: भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे.

सदर ठिकाणी सुधारीत बांधकाम परवानगी देतेवेळी अग्निशमन विभागाकडील प्रोव्हिजनल फायर एनओसी क्र. एफपीएच/१५१/२०१८, दिनांक ११/०७/२०१८ व अंशत: भोगवटा प्रमाणपत्र देतेवेळी क्र. एफएफएच/५७/२०२२, दिनांक १६.०६.२०२२ अन्वये परवानगी देण्यात आली आहे.

आर्ट अँड क्राफ्ट व्हिलेज टुरिझम प्रोजेक्टकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत जा. क्र. MTDC/Incentive/NOC/४७/TP-२०१६/२०१८, दिनांक १०.१०.२०१८ अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

---

**मौजे सोनोरी, दिवे, हिवरे, चांबरी, गराडे (ता.पुरंदर, जि.पुणे) या (पूर्व) चक्राकार महामार्गाची पुर्नआखणी करण्याबाबत**

**(३६) ५९७९१ (२५-०४-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), अॅड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सोनोरी, दिवे, हिवरे, चांबरी, गराडे (ता.पुरंदर, जि.पुणे) या भागातून ९० मीटर रुंदीचा पुणे (पूर्व) चक्राकार महामार्ग जात असून या महामार्गाच्या भूसंपादनामुळे येथील शेतकऱ्यांची घरे, फळबागा, विहिरी, बोअरवेल इ. मोठया प्रमाणावर बाधित होत असून त्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मार्गाची पुर्नआखणी करुन सदर रस्ता डोंगराच्या बाजूने घेतल्यास यासाठी संपादित करण्यात येणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनींचे होणारे नुकसान टाळणे तसेच डोंगराच्या बाजूच्या जमिनीचा रेडीरेकनरचा दर कमी असल्याने शासनाला भूसंपादनापोटी द्याव्या लागणाऱ्या निधीची देखील बचत होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्गाची पुर्नआखणी करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०५-०७-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या (NHAI) अखत्यारीतील पुणे-औरंगाबाद ग्रीन फिल्ड एक्सप्रेस वे व पुणे चक्राकार पूर्व मार्ग (मौजे वळते व शिवरे) यामधील ३२.०० कि.मी.च्या सामाईक लांबीमध्ये १०० मीटर रुंदीचा रस्ता असून या लांबीमध्ये मौजे सोनोरी, दिवे, हिवरे, चांबळी व गराडे ही गावे बाधित होत आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलसंधारण महामंडळामार्फत बीड जिल्हयातील जलसंधारणाच्या कामांची स्थगिती उठविण्यात आल्याबाबत**

**(३७) ६०१८७ (२५-०४-२०२३). श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलसंधारण महामंडळामार्फत बीड जिल्हयातील जलसंधारणाच्या कामास माहे मे, २०२२ मध्ये मंजुरी मिळाली सदर मंजूर करण्यात आलेल्या कामांना माहे जुलै, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान स्थगिती देण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये सर्व जलसंधारणाच्या कामांना दिलेली स्थागिती उठविण्यात आली असून या कामांपैकी आष्टी, पाटोदा (ता.शिरूर,जि.बीड) जलसंधारणाच्या कामांना ७३ (६५) कामांची स्थगिती उठविण्यात न आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यात सिंचन क्षेत्र वाढविण्यासाठी जलसंधारणंतर्गत विविध उपाययोजना करुन दुष्काळग्रस्त भाग टँकर मुक्त करण्यासाठी कालबद्ध नियोजन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, अंशत: खरे आहे.
आष्टी, पाटोदा, शिरुर तालुक्यातील जलसंधारण महामंडळाकडून एकूण ८० प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांपैकी आष्टी तालुक्यातील १, पाटोदा तालुक्यातील ३ व शिरुर तालुक्यातील ११ अशा एकूण १५ कामांच्या निविदेवरील स्थगिती उठविण्यात आली आहे. उर्वरित ६५ कामांची निविदा कार्यवाही चालू आहे.
(३) आष्टी, पाटोदा, शिरुर तालुक्यातील क्षेत्र वाढविण्यासाठी व दुष्काळग्रस्त भाग टँकरमुक्त करण्यासाठी मा.मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनेंतर्गत, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना घटक २.० जलयुक्त शिवार अभियान २.० गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार योजनांतर्गत जलपुनर्भरणाच्या योजना हाती घेण्यात येवून कामे पूर्ण करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील पूर्व व पश्चिम द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ''प्रवेश नियंत्रित मार्ग'' प्रकल्प हाती घेतल्याबाबत**

**(३८) ६०२८५ (२४-०४-२०२३). श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील पूर्व व पश्चिम द्रुतगती मार्गावर वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ''प्रवेश नियंत्रित मार्ग'' प्रकल्प हाती घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, सदर प्रकल्पासाठी अंदाजे किती खर्च अपेक्षित आहे, सदरहू प्रकल्प किती कालावधीत पूर्ण करण्याबाबत शासनाकडून नियोजन करण्यात आले आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :**
(१), (२), (३) व (४) मुंबई महानगरातील पश्चिम द्रुतगती महामार्गावर वाहतुकीची कोंडी दूर करण्यासाठी 'प्रवेश नियंत्रित मार्ग' अभ्यासाकरीता प्राधिकरणामार्फत मे. लुईस बर्जर सल्लागाराची माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये नियुक्ती करण्यात आली. सदर अभ्यासांतर्गत सल्लागाराने आवश्यक असणारे विविध प्रकारचे सर्वेक्षण करून द्रुतगती महामार्गावर आवश्यक असणारे भूयारी मार्ग, उन्नत मार्ग आणि उड्डाण पूल उभारण्याबाबत शिफारशी केल्या आहेत. तसेच इंटेलिजेंट ट्रान्सपोर्ट सिस्टिमच्या अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत देखील शिफारस करण्यात आली आहे. तथापि, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये, मुंबई महानगर- पालिकेच्या हद्दीतील असलेल्या पूर्व द्रुतगती महामार्ग व पश्चिम द्रुतगती महामार्ग यांची देखभाल व परिरक्षण करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेस दि. २९.११.२०२२ रोजी हस्तांतरित करण्यात आलेला आहे. तथापि, सद्यस्थितीत उपरोक्त दोन्ही महामार्ग मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आहेत, प्रस्तावित "प्रवेश नियंत्रित मार्ग" प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे त्याबाबतच्या शिफारशी कळविण्यात आल्या असून, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर, त्या जशाच्या तशा लागू करणे शक्य आहे किंवा कसे? याबाबतची पडताळणी करण्यात येत आहे. त्याबाबत टप्प्याटप्प्याने कामे हाती घेण्याचे नियोजीत आहे.

---

## मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत सामावून घेण्याबाबत

**(३९) ६०२८६ (२६-०४-२०२३). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने अल्पसंख्यांक समाजाचा आर्थिक शैक्षणिक व सामाजिक स्तर उंचावण्याचे उद्देशाने सन २००२ साली अल्पसंख्यांक विकास विभागांतर्गत मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळाची स्थापना केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामंडळ स्थापनेला २१ वर्षे पूर्ण होऊन ५०० कोटीचे भाग भांडवल असणाऱ्या महामंडळाचे कामकाज कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अवलंबून असून आजतागायत एकही कर्मचारी नियमित करण्यात आला नसल्याचे तसेच महामंडळासाठी शासनाने (वित्त विभाग) ७५ पदे मंजूर केली असतांना फक्त ५० कर्मचारी संख्या असून कंत्राटी स्वरुपात असल्याचे निदर्शनास आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, तसेच महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निवृत्त होऊनही त्यांचे जागी नवीन व्यवस्थापकीय संचालकाची नियुक्ती करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सन २०१५ नंतर महामंडळाने व्यवसाय कर्ज देखील सुरु केले नसल्याचे तसेच शैक्षणिक कर्ज मर्यादा १५ ते २० लाखापर्यंत करण्याबाबत विविध मागण्यांबाबतचे निवेदन अल्पसंख्याक समाज नागरीक तसेच राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस पार्टी, सांगली जिल्हा यांचेकडून शासनास सादर करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुंषगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०७-२०२३) :** (१) शासनाने राज्यातील अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक दृष्टया दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना दि. २८ सप्टेंबर, २००० रोजी केलेली आहे.

(२) मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळासाठी अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय दि. १४ फेब्रुवारी, २०२२ अन्वये रु. ७००.०० कोटी पर्यंत भागभांडवल वाढविण्यात आले आहे. महामंडळाच्या कामकाजासाठी अल्पसंख्याक विकास विभाग, शासन निर्णय, दि. १२ जून, २०१३ अन्वये १५७ पदांचा सुधारित आकृतिबंध मंजुर करण्यात आला आहे. त्यापैकी सद्य:स्थितीत ४५ अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत. व्यवस्थापकीय संचालक हे पद अतिरिक्त कार्यभाराने भरण्यात आलेले असून उर्वरित ४४ पदावर कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. या व्यतिरिक्त मुख्यालयात व जिल्हा कार्यालयात ३० रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवा घेण्यात आलेल्या आहेत.

महामंडळातील रिक्त पदे नियमितपणे भरण्याची कार्यवाही विभागामार्फत सुरु आहे.

(३) हे खरे नाही, महामंडळात कार्यरत असलेले व्यवस्थापकीय संचालक हे दि. ३० सप्टेंबर, २०२१ रोजी सेवानिवृत्त झाल्यानंतर दि. ४ मार्च २०२२ पासून व्यवस्थापकीय संचालक हे पद अतिरिक्त कार्यभाराने भरण्यात आलेले आहे. सदरचे पद प्रतिनियुक्तीने भरण्यासाठी शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या व्यावसायिक कर्ज योजना सुरु करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी, सेवाभावी संस्था व अल्पसंख्याक समाजातील प्रतिनिधी यांच्यामार्फत करण्यात आली आहे. दि. १ नोव्हेंबर, २०२२ पासून NMDFC च्या सहकार्याने राबविण्यात येणारी मुदत कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे. NMDFC यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम शैक्षणिक कर्ज योजनेची Credit Line-१ व Credit Line-II अशी विभागणी करण्यात आली असून Credit Line-१ अंतर्गत देशांतर्गत शिक्षणासाठी रु.२०.०० लाखापर्यंत कर्ज व विदेशी शिक्षणासाठी रु. ३०.०० लाखापर्यंत व Credit Line- II अंतर्गत देशांतर्गत शिक्षणासाठी रु.

२०.०० लाखापर्यंत  कर्ज व विदेशी शिक्षणासाठी रु. ३०.०० लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५ मार्गिका उल्हासनगरपर्यंत वाढविण्याबाबत**

**(४०)  ६०३९६ (२४-०४-२०२३).  श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५ या २४ कि.मी. मार्गिकेचा सविस्तर अहवालास मान्यता दिली असून मेट्रो-५ या मार्गिकेचा विस्तार हा उल्हासनगर-अंबरनाथ-बदलापूर पर्यंत करण्यात यावा, अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो-५ हा उल्हासनगर पर्यंत विस्तार करण्यासाठी सन २०१९ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने या बाबत सर्वेक्षण तथा आवश्यक ती कार्यवाही सुरु केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशनने दिनांक ६ जानेवारी, २०२१ रोजी सुसाध्यता अहवाल सादर केला असून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या स्तरावर छाननी करुन मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने ठाणे-भिवंडी-कल्याण मेट्रो मार्ग-५ उल्हासनगर पर्यंत वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१), (२), (३), (४) व (५) होय खरे आहे.
सदर मागणीचा विचार करता तत्कालीन मा. नगरविकास मंत्री तथा अध्यक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सदर विस्तारित मार्गिकेची सुसाध्यता तपासणी करण्याचे निर्देश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिले होते. त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मे. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांची सुसाध्यता अहवाल तयार करण्यासाठी नियुक्ती केली होती. सल्लागाराने सदर सुसाध्यता अहवाल माहे जानेवारी, २०२१ रोजी सादर केला आहे.
सुसाध्यता अहवालाच्या आधारावर योग्य त्या सार्वजनिक वाहतूक प्रणालीसाठी (Transit System) सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता सल्लागाराची नियुक्ती करण्यास प्राधिकरणाने १५४ व्या बैठकीत मान्यता दिली आहे.
सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी सल्लागार नियुक्त करण्याची निविदा प्रकिया प्रगतीपथावर आहे.

---

**भूगांव (ता.मुळशी, जि.पुणे) येथील ग्रामपंचायत हद्दीतील भूखंड दिर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने किंवा कायमस्वरुपी मिळण्याबाबत**

**(४१)  ६०६३३ (११-०५-२०२३).  श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भूगांव (ता.मुळशी, जि.पुणे) येथील ग्रामपंचायत हददीत पायाभूत सोईसुविधा निर्माण करण्यासाठी आवश्यक असणारे भूखंड दिर्घ मुदतीच्या भाडे पट्टयाने किंवा कायमस्वरुपी मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त,

महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांना दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर निवेदनाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २० (४) अन्वये दिनांक ११ डिसेंबर, २०१८ रोजी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणासाठी सुधारीत विकास नियंत्रण नियमावली शासनाने मंजूर केली असून, त्यानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे "FSI" च्या मोबदल्यात हस्तांतरीत झालेले सुविधा भूखंड ई-लिलाव पध्दतीने ८० वर्षांच्या दीर्घ मुदतीने भाडेपट्टयाने घ्यावयाचे असल्यास प्रचलित धोरणानुसार जाहिर ई-लिलाव पध्दतीने अनुज्ञेय वापरासाठीच घेता येईल, असे सन्माननीय लोकप्रतिनिधींना दिनांक १३.०२.२०२३ रोजीच्या पत्राद्वारे प्राधिकरणामार्फत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्यांक बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(४२) ६०६८७ (२५-०४-२०२३). श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाकडून अल्पसंख्यांक बेरोजगारांना ३० लाखपर्यंत कर्ज देणेबाबत कर्ज वितरक बँकांकडून टाळाटाळ होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेतंर्गत राज्यातील किती अल्पसंख्यांक बेरोजगारांना कर्ज उपलब्ध करून देण्यात आले आहे,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबतची सद्य स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२३) :**
१) हे खरे नाही, मौलाना आजाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ हे राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित महामंडळ, नवी दिल्ली (NMDFC) यांची राज्य वाहिनीकृत यंत्रणा म्हणून महाराष्ट्र राज्यामध्ये कार्यरत आहे. NMDFC मार्फत महामंडळास कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध होतो. NMDFC मार्फत मुदत कर्ज योजनेअंतर्गत अल्पसंख्याक बेरोजगारांना व्यवसायासाठी Credit Line-१ अंतर्गत रु. २०.०० लाखापर्यंत व Credit Line-II अंतर्गत रु. ३०.०० लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेअंतर्गत भारतरत्न मौलाना अबुल कलाम आजाद यांच्या जयंती दिनापासून म्हणजेच दि. ११ नोव्हेंबर,२०२२ पासून नव्याने अर्ज स्वीकारण्यात येत आहेत. सदर योजनेअंतर्गत मंजुरीपत्रे निर्गमित करण्यात आली आहेत, वैधानिक दस्तावेज व आगाऊ दिनांकित धनादेशाची पूर्तता केल्यानंतर महामंडळामार्फत सदर कर्जाची रक्कम संबंधित लाभार्थ्याच्या खात्यावर जमा करणे प्रस्तावित आहे.
(२) NMDFC मार्फत राबविण्यात येणाऱ्या मुदत कर्ज योजनेअंतर्गत राज्यातील सर्व जिल्हा कार्यालयामध्ये आतापर्यंत १५५३ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी १४४४ अर्ज मुख्यालयास प्राप्त झाले असून त्यापैकी ९१० अर्जदारांना मंजुरीपत्रे निर्गमित करण्यात आलेली आहेत. वैधानिक दस्तावेजांची पूर्तता केलेल्या लाभार्थ्यांना कर्जाची रक्कम वितरीत करण्याचे

काम प्रगतीपथावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही. कर्ज मंजुरीपत्र निर्गमित केलेल्या लाभार्थ्यांनी वैधानिक दस्तावेज व आगाऊ दिनांकित धनादेशाची पूर्तता जिल्हा कार्यालयामध्ये करणे अपेक्षित आहे. ज्या लाथार्थ्यांनी वैधानिक दस्तावेज व आगाऊ दिनांकित धनादेशाची पूर्तता जिल्हा कार्यालयामध्ये केलेली आहे तसेच कर्ज वसुलीसाठी NACH बाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मंजूर करण्यात आलेल्या कर्जाची रक्कम लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आर्वी, आष्टी, कारंजा (जि.वर्धा) तालुक्यातील खचलेल्या व बुजलेल्या विहिरींची दुरुस्ती करण्याबाबत

**(४३) ६०८४६ (११-०५-२०२३). श्री.दादाराव केचे (आर्वी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आर्वी, आष्टी व कारंजा (जि.वर्धा) तालुक्यात माहे जुलै ते सप्टेंबर, २०२२ मध्ये सतत झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील विहीरी खचून बुजल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या शेतातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकाला मोठ्या प्रमाणात शासनामार्फत मदत देण्यात आली आहे परंतु त्याबाबत निघालेल्या शासन निर्णयामध्ये खचलेल्या व बुजलेल्या विहीरींच्या समावेश नसल्यामुळे शेतकऱ्यांना मदत देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, काही दिवासात रब्बी हंगामाला सुरूवात होणार असून गहू, चना, कापूस, संत्रा पिकाचे उत्पन्न घेण्यासाठी सिंचन कसे करावे हा प्रश्न शेतकऱ्यांना निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहीरी दुरुस्तीकरिता शासन निर्णयामध्ये दुरूस्ती करून मदत जाहीर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-०७-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) याबाबत कोणतीही तक्रार वा सूचना संबंधित तहसिलदार यांचेकडे प्राप्त झालेली नाही.
(४) केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती (SDRF/ NDRF) निकषाच्या धर्तीवर, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत होणाऱ्या आपदग्रस्तांना राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदतीचे वाटप करण्यासाठी मदतीच्या विविध बाबी व मदतीचे दर शासन निर्णय क्र. सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म ३ दिनांक २७ मार्च, २०२३ अन्वये निश्चित केले आहेत. त्यानुसार अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे च शेतजमिनींचे नुकसान झाल्यास मदत अनुज्ञेय असून खचलेल्या च बुजलेल्या विहीरी दुरुस्तीकरीता मदत अनुज्ञेय नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेच्या लेखापरिक्षण तसेंच सेवा प्रवेश नियमांत बदल केल्याबाबत

**(४४) ६०९०१ (११-०५-२०२३). डॉ.किरण लहामटे (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०६(१) व (२) आणि प्रकरण तीनच्या दोन नुसार प्रत्येक वर्षी जमा खर्चाचे लेखा परीक्षण करणे अनिवार्य आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेचे लेखा व वित्त विभागाकडील जमा व खर्च याचे लेखापरीक्षण सन २००८-२००९ पासून म्हणजेच मागील पंधरा वर्षात विभागाकडून करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लेखा आणि लेखापरीक्षण विभागात या पदोन्नत्या टाळता याव्यात म्हणून वेळोवेळी सोयीप्रमाणे शासनास प्रस्ताव पाठवून पदांचे सेवाप्रवेश बदलले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील इतर महानगरपालिकांचे सेवा प्रवेश आणि पुणे महानगर पालिकेचे सेवा प्रवेश यात कमालीची तफावत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, लेखा परीक्षण होत नसल्याने पुणे महानगरपालिकेत लेखा परीक्षकांच्या संगनमताने गैरव्यवहार वाढला असून याबाबत अनेक तक्रारी होऊन प्रकरणे उघडकीस आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही. पुणे महानगरपालिका सेवा (सेवाप्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ ला दि. २६.०८.२०१४ रोजी शासनाची मान्यता देण्यात आली आहे. राज्यातील इतर महानगरपालिकांचे सेवाप्रवेश नियम स्वतंत्र आहेत.
(५) सन २०२०-२१ अखेर लेखापरीक्षण पूर्ण करण्यात आले असून सन २०१९-२० अखेर लेखापरीक्षण अहवाल स्थायी समितीस सादर करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील अनेक गृहसंकुलात कचऱ्याचे वर्गीकरण होत नसल्याबाबत करावयाची उपाययोजना**

**(४५) ६०९५० (१२-०५-२०२३). श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईंदर (जि.ठाणे) येथील अनेक गृहसंकुलात कचऱ्याचे वर्गीकरण होत नसल्याने जवळपास ९०० इमारतींना महापालिकेने नोटीस बजावली असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी कचरा वर्गीकरण व्यवस्थित व्हावे याकरिता प्रशासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दररोज अंदाजे ५५० मेट्रीक टन घनकचरा निर्माण होतो.

सदर निर्माण होणारा दैनंदिन घनकचरा महानगरपालिकेच्या बंदिस्त वाहनांमार्फत स्वतंत्रपणे थेट पध्दतीने (Door to Door) गोळा करण्यात येतो.

शासन परिपत्रकानुसार घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ मधील तरतूदीनुसार, मिरा-भाईंदर शहरात दैनंदिन निर्माण होणारा कचरा निर्मितीच्या ठिकाणीच विलगीकरण करणेसाठी घनकचरा विलगीकरण मोहिम सुरू करण्यात आली आहे.

यामध्ये शहरातील सोसायटींना त्यांचे सोसायटीमधून दैनंदिन निर्माण होणारा कचरा ओला कचरा व सुका कचरा याप्रमाणे वेगवेगळा करून महानगरपालिकेच्या कचरा गाडीमध्ये देणेच्या दृष्टीने २४० लिटर क्षमतेचे दोन नग कचरापेट्ट्या यापूर्वीच सोसायट्यांना वाटप करण्यात आलेल्या आहेत.

घनकचरा वर्गीकरणामध्ये सुधारणा करणेकामी महानगरपालिकेस सहकार्य करणेबाबत सर्व इमारतींना पत्र देऊन

आवाहन करण्यात आलेले आहे.

१०० किलो पेक्षा जास्त कचरा दररोज निर्माण करणाऱ्या सोसायट्यांना त्यांनीच ओला कचरा प्रक्रिया करण्याची व्यवस्था करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

(२) शासन परिपत्रकानुसार घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २०१६ मधील तरतूदीनुसार, महापालिकेमार्फत सर्व सोसायट्यांना भित्तीपत्रके, हँडबिल वाटप करण्यात आलेले आहेत. तसेच, संबंधित स्वच्छता निरीक्षकामार्फत मार्गदर्शन करण्यात आले आहे.

घनकचरा वर्गीकरणामध्ये सुधारणा होण्याच्या दृष्टीने शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये कचरा वर्गीकरणावर निबंध स्पर्धा आयोजित करून, तसेच, शहरातील महिला बचत गटामार्फत जनजागृती करण्यात आलेली आहे.

कचरा वाहतूक वाहनांवर ध्वनीक्षेपण यंत्राद्वारे नागरिकांमध्ये जनजाग,ती करण्यात येत आहे. सदर मोहिमेस नागरिकांमडून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्ह्यातील वाल्मी संस्थेत कंत्राटदाराच्या देयकात केलेला गैरव्यवहार**

**(४६) ६११६५ (२६-०४-२०२३). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील वाल्मी संस्थेतील लेखाधिकारी, श्री.प्रदीप बाहेकर व कनिष्ठ अभियंता, श्री. मोहन शेलार यांनी कंत्राटदाराचे देयक थकवून देयक मंजुरीसाठी रुपये ३० हजाराची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,वाल्मी संस्थेने नियमबाह्य पद्धतीने व लेखाधिकारी श्री.बाहेकर तांत्रिक अधिकारी नसताना सुद्धा त्यांच्याकडे महासंचालक,या वर्ग-१ च्या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला असून त्यांना उत्कृष्ठ कामाबद्दल पुरस्कार दिल्याचे दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.बाहेकर यांनी संगनमताने वाल्मी संस्थेतील सी.सी.टीव्ही, हॉटेल व्यवस्थापन, लॅब दुरुस्ती इत्यादी अंदाजे रु. १० लक्ष खर्चाची कामे निविदा न काढता स्वत:च्या नातेवाईक व मित्र यांना दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी संबंधित दोषीविरुध्द कारवाई करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी सचिव, मृद व जलसंधारण विभागास माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान तक्रार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुंषगाने वाल्मी संस्थेतील दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०७-०७-२०२३) :** (१) होय, हे अशत: खरे आहे. वित्त विभागाच्या दि.१ मार्च, २०२३ च्या शासन आदेशान्वये संबंधिताना निलंबित करण्यात आले आहे.

(२) होय, हे अशंत: खरे आहे. श्री.बाहेकर लेखाधिकारी हे आयुक्त, मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद येथे कार्यरत असताना तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, औरंगाबाद हे पद प्रशासकीय स्वरुपाचे असल्याने या पदाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. महासंचालक या पदाचा नाही.

तसेच त्यांना आयुक्त, मृद व जलसंधारण विभागातील बिंदू नामावली व इतर प्रशासकीय कामे चांगली केल्याबद्दल दि. २६ जानेवारी, २०२३ रोजी आयुक्त, मृद व जलसंधारण विभागामार्फत सदर प्रशस्ती प्रमाणपत्र हे वरील घटनेच्या पूर्वीच्या कामकाजासंबंधी दिले आहे.हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.
(४) अशा प्रकारची तक्रार माहे नोव्हेंबर, २०२२ वा त्या दरम्यान विभागास प्राप्त झालेली नाही.
(५) वित्त विभागाच्या शासन आदेश क्र.निलंबन -२०२३/प्र.क्र.८/को.प्र.१, दिनांक ०१ मार्च, २०२३ च्या शासन आदेशान्वये संबंधितांना निलंबित करण्यात आले आहे.
(६) प्रश्न उदभवत नाही.

---

## पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामावरील शास्तीकर रद्द करण्याबाबत

**(४७) ६१५५९ (११-०५-२०२३). श्री.दिलीप मोहिते-पाटील (खेड आळंदी), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) शहरातील अनधिकृत बांधकामावरील शास्तीकर रद्द करणेबाबत हिवाळी अधिवेशन, २०२२ मध्ये सभागृहात मा.उपमुख्यमंत्री यांनी घोषणा केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयाची प्रत्यक्षात अंमलबजावणी दिनांक १९ जानेवारी, २०२३ अखेर या शहरातील किती अनधिकृत बांधकामांचा शास्तीकर रद्द करण्यात आला आहे, असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, या निर्णयाची प्रत्यक्षात अंमलबजावणी होण्यास किती कालावधी लागणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) दि. ०३ मार्च, २०२३ चे शासन निर्णयानुसार पिंपरी चिंचवड शहरातील अवैध बांधकामावरील शास्ती रद्द करण्यात आली आहे.
(३) शासन निर्णयाची अंमलबजावणी करणेत आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेतील शिक्षकांना पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील शिक्षकाप्रमाणे वेतन देण्याबाबत

**(४८) ६१६७१ (२४-०४-२०२३). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महापालिकेच्या २६० शाळांपैकी ११० शाळांना मुख्याध्यापक नसणे, हंगामी शिक्षकांना केवळ पंधरा हजार रुपये मासिक वेतन देणे यामुळे अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची बाब दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी देण्यात आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महापालिकेच्या शाळेतील शिक्षकांच्या २०० जागा रिक्त असल्याने काही शाळेतील अनेक वर्ग शिक्षकांविना राहत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होते, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच पुणे महापालिकेच्या शाळांमधील हंगामी शिक्षकांना १५ हजार वेतन दिले जाते तर पिंपरी-चिचंवड महापालिकेच्या शाळांमधील हंगामी शिक्षकांना २५ हजार वेतन दिले जाते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुणे महानगरपालिकेतील शिक्षकांना पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील शिक्षकांप्रमाणे वेतन देण्याबाबत तसेच शिक्षकाची पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१) खरे आहे.
(२) हे खरे नाही. मराठी व ऊर्दु माध्यमासाठी पुरेशे शिक्षक उपलब्ध असून इंग्रजी माध्यमाकरिता काही स्वयंसेवी संस्थाचे

शिक्षक, हंगामी शिक्षक व कंत्राटी शिक्षक वर्गांना दिले असल्याने विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले नसल्याने पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील हंगामी शिक्षकांना २५ हजार वेतन हे माध्यमिक शाळातील कंत्राटी शिक्षकांसाठी देण्यात येत आहे. पुणे महानगरपालिकेतील कंत्राटी शिक्षकांना खालीलप्रमाणे मानधन दिले जाते.

प्राथमिक शिक्षक मानधन रू.१५०००/-

माध्यमिक शिक्षक मानधन रू. १७५००/-

उच्च माध्यमिक शिक्षक मानधन रु.१८५००/-

(४) सन २०२३-२४ च्या शैक्षणिक वर्षाकरिता इंग्रजी माध्यमाच्या कंत्राटी प्राथमिक शिक्षकांसाठी रू. २००००/- मानधन देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## धुळे येथील अल्पसंख्यांक समुदायातील नागरीकांना कर्ज मिळत नसल्याबाबत

**(४९) ६१९२२ (२५-०४-२०२३). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे येथील मौलाना अब्दुल कलाम आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळाचे कार्यालय मागील काही दिवसांपासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, जैन, शिख या अल्पसंख्यांक समाजातील तरुणांसाठी, विद्यार्थ्यांसाठी व व्यवसायाकरिता वेळेवर कर्ज मिळत नसल्याने असंख्य कर्ज प्रकरणे मागील काही दिवसांपासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत सदर अल्पसंख्यांक विकास महामंडळाचे कार्यालय केव्हा सुरु करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुंषगाने धुळे येथील कार्यालयामध्ये अल्पसंख्यांक विकास महामंडळात कर्मचारी नेमण्याबाबत व विद्यार्थी, व्यापारी व उद्योजक यांचे कर्ज प्रकरणे मंजूर होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-०७-२०२३) :** (१) हे खरे नाही,

(२) हे खरे नाही, शैक्षणिक कर्ज योजनेअंतर्गत धुळे जिल्ह्यातून सन २०२२-२३ या वर्षामध्ये एकूण ७ प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी ४ प्रस्तावांना मंजुरीपत्र निर्गमित करण्यात आले असून २ विद्यार्थ्यांना कर्जाची रक्कम वितरीत करण्यात आली आहे. उर्वरित प्रस्तावांपैकी २ कर्ज प्रस्तावात त्रुटी असून त्रुटींची पुर्तता झाल्यावर प्रस्तावांना मान्यता देण्यात येईल. १ प्रस्ताव विदेशी शिक्षणासाठी कर्जाचा असून तो विचाराधीन आहे.

राष्ट्रीय अल्पसंख्याक विकास व वित महामंडळ, नवी दिल्ली मार्फत राबविण्यात येणारे मुदत कर्ज योजनेअंतर्गत धुळे जिल्हयातून आतापर्यंत ३० कर्ज प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी २४ कर्ज प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे. उर्वरित ६ कर्ज प्रस्तावांपैकी ४ प्रस्तावांची छाननी सुरु असून २ कर्ज प्रस्तावांतर्गत त्रुटी आढळून आल्या आहेत. त्रुटींची पुर्तता झाल्यानंतर संबंधीत अर्जदारांना कर्ज मंजुर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या वाघोली गावातील सार्वजनिक वापराची जागा पीएमआरडीएकडून पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करणेबाबत

**(५०) ६२१७८ (२४-०४-२०२३). ॲड.अशोक पवार (शिरुर), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेमध्ये वाघोली गावाचा समावेश झालेला असून सार्वजनिक वापरासाठी असलेल्या रस्त्यांचे पीएमआरडीएकडून पुणे महानगरपालिकडे अद्यापपर्यंत हस्तांतरीत झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक सोसायटीकडे जाणारे रस्त्यांच्या अडवणूकीमुळे येथील नागरिकांची गैरसोय होत आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुणे महानगरपालिकेने अथवा पीएमआरडीएने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(४) तसेच पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या वाघोली गावातील सार्वजनिक वापरासाठी असलेल्या जागा पीएमआरडीएकडून पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरण करण्याबाबत शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०७-२०२३) :** (१), (२) व (३) दि. ०६/०६/२०२१ रोजीच्या शासन अधिसूचनेव्दारे वाघोली या गावाचा समावेश पुणे महानगर पालिकेत समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. ३१/०३/२०१५ रोजी स्थापनेपासूनचे प्राधिकरणाच्या ताब्यातील रस्ता रुंदीकरणाखालील ३८,८४१.६० चौ.मी. एवढे क्षेत्र प्राधिकरणाद्वारे पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहे. तथापि, रेखांकनामध्ये जे अंतर्गत रस्ते दर्शविलेले असतात त्यावरून लगतच्या नागरीकांना अडथळा करता येणार नाही, असे बंधन विकासकावर घालण्यात येते व असा अडथळा संबंधीतांनी निर्माण केल्यास तो कायदेशीर कारवाई करुन तो काढून टाकण्यात येतो. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत घेतली जाते.
(४) व (५) पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या स्थापनेपूर्वी जिल्हाधिकारी, पुणे कार्यालयाकडून विकास परवानगी मंजूरी प्रस्तावातील ३७ प्रकरणी सर्व सुविधा क्षेत्र व रस्ता रुंदीकरणाखालील क्षेत्र पुणे महानगरपालिकाकडे हस्तांतरित केले आहे. तसेच पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून विकास परवानगी देण्यात आलेल्या प्रस्तावांपैकी ११ प्रकरणी हस्तांतरणांची कार्यवाही पूर्ण झाली असून त्यामध्ये एकूण २४ ठिकाणांच्या रस्ता रुंदीकरणाखालील एकूण क्षेत्र ३८,८४१.६० चौ.मी. व एकूण ३३ सुविधा भूखंडाचे क्षेत्र ५७,३१९.८५ चौ.मी. एवढे क्षेत्र पुणे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केले असून उर्वरित २४ प्रकरणामध्ये हस्तांतरणाची कार्यवाही प्राधिकरणामार्फत सुरु आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.